व्यवसाय तुमचा...व्यासपीठ आमचं...
आपल्या छोट्या मोठया व्यवसायाच्या, प्रवेशासंबंधी, हॉस्पिटल, वाढदिवसाच्या जाहिराती प्रत्येक ऑनलाईन बातमीसोबत प्रसिद्ध करण्यासाठी आमच्याशी
आजच संपर्क करा
दै.प्रजापत्र लाईव्ह, कार्यालय बीड
मो.९१४५२३३२५५

दैनिक प्रजापत्र
www.prajapatra.com ■ email:prajapatra@gmail.com

अंतरंग
पीकवाढीचे संजीवक –विकास मिरगणे, बालाजी देशमुख २
'तेजस'कडून शेतकऱ्यांसाठी धान्य तारण योजना ५
माळेगावात रंगला बैलगाडा शर्यतीचा थरार ५

● बीड(महाराष्ट्र) ● वर्ष १४ वे ● अंक १८ ● शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६ ● RNI No. : MAHMAR/2013/48137 ● पो.प. : L/241/RNP/RENEWAL/2025-27 ● किंमत ४ रुपये ● पाने –६

# अजित पवारांच्या स्वप्नातील बीड घडविण्यासाठी कटिबद्ध-सुनेत्रा पवार

बीड दि.१२(प्रतिनिधी)–बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आज जिल्ह्याच्या नवनियुक्त पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली.अजित पवार यांच्या निधनानंतर झालेली ही पहिलीच बैठक भावूक वातावरणात पार पडली.यावेळी अजित पवारांच्या स्वप्नातील बीड घडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.बैठकीच्या सुरुवातीला अजित पवार यांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचा आढावा घेणारी एक चित्रफित दाखवण्यात आली.यावेळी माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी शोक प्रस्ताव मांडला.



पिंपरी–चिंचवड आणि बारामती प्रमाणे बीड जिल्ह्याचा कायापालट व्हावा,हे दादांचे स्वप्न होते,अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.अजितदादांना बीड जिल्ह्याविषयी प्रचंड ओढ होती. त्यांचे जे अपूर्ण स्वप्न आहे, ते पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी एकदिलाने आणि प्रामाणिकपणे काम करावे. विकासाची गंगा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. असेही सुनेत्रा पवार यावेळी म्हणाल्या.जिल्ह्याच्या विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे आश्वासन देताना त्यांनी तांत्रिक बाबींची माहिती दिली. जिल्ह्याचा एकूण विकास आराखडा ५८५ कोटी रुपयांचा आहे. त्यापैकी ४८१ कोटी रुपयांचा निधी जिल्ह्याला प्राप्त झाला. ▸▸पान ५ वर

### बैठकीत धनंजय मुंडेंची भावनिक साद

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा नियोजन समितीची पहिली बैठक पार पडली. स्वर्गीय अजित पवार यांच्या निधनानंतर जिल्हा नियोजन समितीची ही पहिलीच बैठक असल्याने वातावरण भावनिक होते. यावेळी धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडल्यानंतर उपस्थितांना उद्देशून ही भावनिक साद दिली.

# सामाजिक न्याय मंत्री असताना धनंजय मुंडेंनी प्रस्तावित केलेल्या योजनेची वचनपूर्ती!

## आता राज्यातील ४ लाख ऊसतोड कामगारांना होणार गृहोपयोगी वस्तू संचांचे वाटप

परळी वैजनाथ दि.१२ (प्रतिनिधी)–सामाजिक न्याय मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी प्रस्तावित केलेल्या ऊसतोड कामगारांच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये या ऊसतोड कामगारांना गृह उपयोगी वस्तूंचे वाटप करण्याचे योजनेची वचनपूर्ती झाली आहे.राज्यातील ऊसतोड कामगार व त्यांचे कुटूंबियांना गळीत हंगामाच्या कालावधीमध्ये अनेक अडी–अडचणींचा सामना करावा लागत असल्याने ऊसतोड कामगारांना 'गृहोपयोगी वस्तू संच' वाटप करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.गृहोपयोगी वस्तू संच वाटप करण्याबाबत गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ४ लाख लाभार्थ्यांना ▸▸पान ५ वर



### राज्यातील जिल्हानिहाय असे आहेत लाभार्थी....

दरम्यान गृह उपयोगी वस्तू संच पुरविण्यासाठी पहिल्या टप्प्यात एक लाख लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे यामध्ये सर्वाधिक लाभार्थी संख्या ही बीड जिल्ह्यात २५००० इतकी आहे तर सर्वात कमी लाभार्थी संख्या परभणी व नांदेड जिल्ह्यात प्रत्येकी ५००० इतकी आहे. दहा जिल्हे व राज्यातील इतर सर्व जिल्ह्यातील ऊसतोड कामगार लाभार्थ्यांच्या आकडेवारीनुसार गृहपयोगी वस्तू संच टप्प्याटप्प्याने वाटप करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यातील दहा जिल्ह्यात लाभार्थी संख्या पुढीलप्रमाणे आहे: बीड २५००० नाशिक ११४०० लातूर ५००० धाराशिव १०,१०० छत्रपती संभाजी नगर १०,००० नांदेड ५००० जळगाव १३४०० जालना ८४०० अहिल्यानगर ६७०० परभणी ५०००.

### ऊसतोड कामगारांना खास शिधासंच

लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेतून बीड जिल्ह्यातील ११ वसतिगृहांना १५९ कोटींचा निधी उपलब्ध करून दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ऊसतोड कामगारांसाठी आणखी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्य शासनाने राज्यातील ४ लाख ऊसतोड कामगारांना सण उत्सव उत्साहात साजरे करण्यात यावेत, यासाठी खास मोफत शिधासंच वाटप करण्याचा निर्णय घेतला असून या बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. आ.धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांचे यश आहे. प्रथम १ लाख नोंदणी झालेल्या कामगारांना हा खास शिधा मिळणार आहे.

# घरात घुसून महिलेला बेदम मारहाण

## पेठ बीडमधील प्रकार; व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर गुन्हा दाखल

बीड दि.१२ (प्रतिनिधी): शहरातील पेठ बीड परिसरातील पाडुरंग नगर भागात घरात घुसून एका महिलेला बेदम मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. हातात काठ्या आज दगड घेऊन महिला थेट दुसऱ्या एका घरात घुसतांना व्हिडिओमध्ये दिसत आहे.

मोठमोठ्या आवाजात शिवीगाळ करत घरात घुसलेल्या महिलांनी त्या ठिकाणी असलेल्या एका वृद्ध महिलेला मारहाण केली. त्यानंतरही मोटरसायकलवर आलेले पाच ते सहा जण घरात घुसल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. सरील व्हिडिओ सोशल मीडियात मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. दोन्ही घर समोरासमोर असून शेजारी असलेल्या एका घरातील महिलांसह ▸▸पान ५ वर

# अंबाजोगाईला 'पुस्तकांचे गाव' दर्जाचा निर्णय रखडला

## तातडीने कार्यवाही करण्याचे आ. नमिता मुंदडा यांचे निर्देश

अंबाजोगाई दि.१२ (प्रतिनिधी): बीड



जिल्ह्यातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या अंबाजोगाई शहराला 'पुस्तकांचे गाव' म्हणून घोषित करण्याच्या प्रक्रियेला गती मिळावी, यासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी प्रशासकीय स्तरावर आक्रमक पाऊले उचलली आहेत. मराठी भाषेचे उगमस्थान मानल्या जाणाऱ्या या शहराचा शासन निर्णय (जीआर) अद्याप प्रशासकीय दिरंगाईमुळे रखडला असून, आमदार मुंदडा यांनी ५ फेब्रुवारी २०२६ रोजी अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून या संदर्भात तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये अंबाजोगाईला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विविध भाषातज्ज्ञांच्या मते येथेच मराठी भाषेचा उगम झाला असून हे स्थान मराठी भाषेची जननी म्हणून ओळखले जाते. मराठीतील आद्यकवी मुकुंदराज यांनी आपल्या अजरामर विवेक सिंधु'' ग्रंथाची रचना याच भूमीत केली आहे. या ऐतिहासिक आणि ▸▸पान ५ वर

## ट्रॅक्टर अंगावर पडून शेत मजुराचा मृत्यु

माजलगाव दि.१२ (प्रतिनिधी): तालुक्यातील हिवरा (बु.) येथे ट्रॅक्टर पलटी होऊन झालेल्या अपघातात २८ वर्षीय शेतमजूर तरुणाचा मृत्यु झाल्याची घटना गुरुवारी (दि.१२) पहाटे घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

गणेश भारत गाडे (वय २८) रा.हिवरा बु. ता.माजलगाव हे शेतमजुरीचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. गुरुवारी पहाटे ▸▸पान ५ वर

# सिमेंटच्या गोणीतून गांजाची तस्करी करणारे दोघे ताब्यात

## नेकनूर पोलिसांच्या कारवाईत पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

नेकनूर दि.१२ (प्रतिनिधी)– जिल्ह्यात अवैध धंद्यांवर कारवायांचे सत्र सुरु असताना नेकनूर पोलिसांनी गांज्याची तस्करीचे रॅकेट उघडकीस केले आहे.सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी करण्यात येत असल्याची ▸▸पान ५ वर



# बीडमध्ये अजित पवार यांच्या स्मारकासाठी मुख्यमंत्र्यांकडून हिरवा कंदिल

## नियोजन बैठकीत आ. विजयसिंह पंडित यांची मागणी

बीड दि.१२ (प्रतिनिधी): सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनांचा प्रारुप आराखडा अंतिम करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नियोजन बैठक झाली. ▸▸पान ५ वर



# गेवराई नगरपरिषद विषय समित्यांच्या निवडी जाहीर

गेवराई दि.१२ (प्रतिनिधी):गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात झालेल्या विशेष सभेत विविध विषय समित्यांच्या सभापती व उपसभापतींच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. नगराध्यक्षा गिता बाळराजे पवार यांच्या उपस्थितीत २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता ही सभा पार पडली. रोहयोचे उपजिल्हाधिकारी श्री. मुळे यांनी अधिकृतरीत्या निवडी जाहीर केल्या.



यामध्ये निवडीनुसार ज्येष्ठ नगरसेवक अ‍ॅड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. उपनगराध्यक्ष रेवती भगवान घुंबार्डे यांना पाणीपुरवठा विभागाचे सभापतीपद देण्यात आले. शेख शहेदाद यांची नियोजन व विकास समितीवर, तर महेश सौंदरमल यांची शिक्षण व सांस्कृतिक समितीवर नियुक्ती करण्यात आली.महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी ▸▸पान ५ वर



# वाहतूक सुरक्षा:सुरक्षित जीवनाचा मार्ग

**वाहतूक सुरक्षेबाबत आपल्याकडे चांगले नियम आहेत; पण ते पाळले जात नाहीत हेच दुर्दैव आहे. वाहतूक सुरक्षा हा सुरक्षित जीवनाचा मार्ग आहे, त्यामुळे अशा घटना रोखण्यासाठी आता सर्वांनी आपली जबाबदारी ओळखण्याची गरज आहे, वाहतूक सुरक्षा दर्जेदार करणे ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे.**





**प्रा.संजय बडे**

भारतातील सर्वच शहरे विशेषत पुणे, मुंबई, दिल्ली, चेन्नई, बंगळूर वाहतूक कोंडीने त्रस्त आहेत. वाहतूक कोंडी ही समस्या दिवसेंदिवस वाढत उग्र रूप धारण करीत आहे. सण-समारंभ, मंत्री यांचे मोर्चे-दौरे, यात अधिक भर घालतात. शहरात वाहतूक कोंडीमुळे प्रवास करण्यास बराच वेळ जातो, आर्थिक प्रगती मंदावते, रस्त्यावरील किरकोळ भांडणे वाढतात, वाहन चालकांची चिडचिड वाढते, वाहनांचे इंधन मोठ्या प्रमाणावर जळते. ज्यामुळे ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढते.

वाहतूक कोंडी का होते याचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. जनमानसात असा समज असा आहे की रस्ते अरुंद, चौकात पोलिस उभे नसल्यास, वाहन चालकाच्या बेशिस्त वागणुकीने होते, मोठ्या/अवजड/माल-वाहतूक वाहना मुळे, सार्वजनिक बस/रिक्षा मुळे, फूटपाथ वाढविल्यास, गती रोधकांमुळे, फूटपाथ वरील अतिक्रमणाने बस थांब्यामुळे अडसर झाल्याने, रस्त्याच्या बाजूला झाडे असल्यास वाहतूक कोंडी होते आणि बरेच काही. पण खरेच या मुळे वाहतूक कोंडी होते का? या यादी मध्ये आपण सोयीनुसार, हेतू पुरस्पर आणि अनावधानाने एक कारण दुर्लक्ष करतो आणि जे सर्वात महत्वाचे आहे - वैयक्तिक खाजगी वाहने!अपघाताच्या घटना नित्याच्या बनत चालल्या आहेत. भरधाव वाहन चालविणे आणि वाहतुकीचे नियम न पाळणे या गोष्टी अपघाताचे मुख्य कारण बनत आहेत. तरुणवर्गामध्ये धूम स्टाईलने वाहन चालविण्याची क्रेझ अशा अपघातांना निमंत्रण देत आहे. वाहतूक सुरक्षेबाबत आपल्याकडे चांगले नियम आहेत; पण ते पाळले जात नाहीत हेच दुर्दैव आहे. वाहतूक सुरक्षा हा सुरक्षित जीवनाचा मार्ग आहे, त्यामुळे अशा घटना रोखण्यासाठी आता सर्वांनी आपली जबाबदारी ओळखण्याची गरज आहे, वाहतूक सुरक्षा दर्जेदार करणे ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. वाढते अपघात, जीवहानी आणि वाहतूक कोंडी रोखण्यासाठी हेल्मेट/सीट बेल्टचा वापर, वेगमर्यादेचे पालन, मद्यपान करून वाहन न चालवणे, आणि वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. रस्ते सुरक्षिततेसाठी शिस्त, जागरुकता आणि उत्तम रस्ते पायाभूत सुविधा अनिवार्य आहेत, जेणेकरून मौल्यवान मानवी जीव वाचवता येतील.

भारतात दरवर्षी अपघातात लाखो लोक जीव गमावतात किंवा अपंग होतात. त्यामुळे सुरक्षिततेचे उपाय कडक करणे अत्यावश्यक आहे.वेगमर्यादा पाळणे, लेन बदलणे, आणि वाहनांमध्ये सुरक्षित अंतर ठेवणे यांसारख्या सवयींचे पालन करणे जीव वाचवण्यासाठी आवश्यक आहे.मद्यप्राशन करून गाडी चालवणे, गाडी चालवताना मोबाईल वापरणे, आणि सिग्नल तोडणे यांवर कडक कारवाई होणे गरजेचे आहे.रस्ते सुरक्षित करणे, 'ब्लॅक स्पॉट' शोधून दुरुस्त करणे आणि चालकांमध्ये शिक्षणाद्वारे जागृती करणे गरजेचे आहे.

भारतामध्ये रस्ते अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून दरवर्षी हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागत आहे. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून वाहतूक सुरक्षेला अधिक दर्जेदार व प्रभावी बनवणे ही केवळ प्रशासनाची नव्हे तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.वाहतूक सुरक्षा दर्जेदार करण्यासाठी सर्वप्रथम कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. नियम तोडणाऱ्यांवर प्रभावी दंड, परवाना रद्द करण्याची कारवाई आणि सातत्याने तपासणी झाल्यास शिस्त निर्माण होऊ शकते. तंत्रज्ञानाचा वापर करून सीसीटीव्ही, ई-चलान प्रणाली, वेगमापक यंत्रणा अधिक सक्षम करणे गरजेचे आहे.दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जनजागृती. शाळा, महाविद्यालये, कार्यालये आणि माध्यमांच्या माध्यमातून वाहतूक नियमांचे महत्त्व नागरिकांच्या मनावर बिंबवले पाहिजे. रस्ता आपला आहे, जबाबदारीही आपलीच आहे ही भावना रुजवणे आवश्यक आहे.तसेच पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे तितकेच महत्त्वाचे आहे. चांगले रस्ते, स्पष्ट दिशादर्शक फलक, सुरक्षित पादचारी मार्ग, सायकल ट्रॅक, आणि योग्य सिग्नल व्यवस्था असल्यास अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी होऊ शकते. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास खासगी वाहनांचा ताणही कमी होईल.शेवटी, वाहतूक सुरक्षा ही केवळ कायद्याने लादलेली बंधने नसून ती जीवनरक्षक मूल्ये आहेत, हे प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे. एक क्षणाची घाई आयुष्यभराचा पश्चात्ताप ठरू शकते. म्हणूनच सुरक्षित वाहतूक ही सवय बनली पाहिजे. प्रशासन, नागरिक आणि समाज यांनी एकत्र येऊन प्रयत्न केल्यासच वाहतूक सुरक्षा खऱ्या अर्थाने दर्जेदार होऊ शकेल.रस्त्यावर वाहन चालवताना होणारी एक चूक वाहनधारकाच्या जीवावर बेतते. त्यामुळे रस्ता सुरक्षेसाठी वाहतूक नियमांचे पालन सर्वांनी करणे आवश्यक आहे. अपघातामध्ये जखमींना वेळेवर मदत न मिळाल्याने त्यांचा जीव जातो. त्यामुळे रस्ते अपघातात जखमीला त्वरित वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. अपघातातील जखमीला मदत केल्यामुळे पोलिसांकडून तुम्हाला कोणताही त्रास दिला जात नाही. वाहन चालवताना स्वतःची काळजी घ्या, तसेच रस्त्यावरील इतरांचीही काळजी घ्या, जास्त भार असलेली वाहने थेट आणि अप्रत्यक्षपणे रस्ते अपघातांना कारणीभूत ठरतात. ओव्हरलोड केलेले वाहन अपघातास प्रवण असते कारण आपत्कालीन परिस्थितीत ते नियंत्रित करणे कठीण असते आणि त्यामुळे रस्त्यांच्या गुणवत्तेवरही परिणाम होतो, ज्यामुळे प्रवाशांना अपघात होण्याची शक्यता वाढते.भारतात, रस्ते बांधकामाचा दर्जा कमी आहे आणि बांधकाम व्यावसायिकांकडून रस्त्यांचे मानके लागू केली जात नाहीत, ज्यामुळे खड्डे निर्माण होतात; तसेच, भारतात रस्त्यांची देखभाल ही प्रतिबंधात्मक उपायापेक्षा सुधारात्मक उपाय आहे.जुनी वाहने नियमनाशिवाय धावतात आणि त्यामुळे हाय स्पीड एक्सप्रेसवेवर टायर फुटतात.

देखरेखीच्या पायाभूत सुविधांच्या अभावामुळे 'हिट अँड रन' प्रकरणांचा तपासच होत नाही, ७३% दुचाकी अपघातग्रस्त हेल्मेट घालत नाहीत आणि चारचाकी वाहनचालकांपैकी एक मोठा भाग सीटबेल्ट घालत नाही किंवा त्यांच्याकडे ड्रायव्हिंग लायसन्स नाही.अपघातस्थळी प्रथमोपचाराची व्यवस्था आणि उपलब्धता आणि अपघातग्रस्तांना घटनास्थळापासून रुग्णालयात नेण्याची व्यवस्था बहुतेक महामार्गांवर अपुरी आढळते.

---

# प्रेम

विचार पुष्प



**रणजीत भोसले**

व्यक्ती तितक्या प्रकृती अशी म्हण आहे. त्याचा अर्थच असा की, स्वभावा प्रमाणे प्रत्येकाची आवड ही निराळी असणारच. म्हणून द्वेष बुद्धी नाहीशी करण्याकरिता, प्रत्येकाच्या स्वभावाला थोडी सवलत ठेवणे जरूर आहे आणि प्रेम जडण्याकरिता सर्वांना आवडणारी जी गोष्ट असेल तिकडे लक्ष देणे जरूर आहे. प्रेम करण्याचा धडा गिरवताना सुरूवात आपल्या घरापासून करावी. घरातली माणसे नंतर शेजारी आणि त्यानंतर आजूबाजूला आपलेपणाची भावना आपल्या कृतीने वाढवावी म्हणजे क्रमाक्रमाने प्रेमाची वाढ होऊन सर्व वातावरण प्रेममय होऊन जाईल. सर्वांशी निष्कपट प्रेमाने वागावे आपल्या बोलण्यामध्ये नव्हे पाहण्यामध्ये सुद्धा प्रेम असावे. आपले बोलणे अगदी गोड असावे आपल्या अंगी सहजता यावी घरामध्ये अमुक एक गोष्ट कराच किंवा नकाच करू असे हट्टाने न म्हणता आपण राहावे. जसे घडेल तसे घडू द्यावे. आपण संपलो की दुनिया आपल्यासाठी संपलेली असते. म्हणून जोवर आपले अस्तित्व आहे, तोवर आनंदी रहा व स्वतःवर प्रेम करा. जोवर आपण स्वतःवर प्रेम करू शकणार नाही, तो पर्यंत इतरां विषयी आपल्या मनात प्रेमाची स्पंदने उत्पन्नच होऊ शकणार नाही. जीवन हे क्षणभंगूर आहे, म्हणून जो आपल्यावर जीवापाड प्रेम करतो, त्याला कधीच अंतर देऊ नका. आयुष्याकडे समाधानाने बघा, स्वतः आनंदी राहा, आणि दुसऱ्यांनाही आनंदी करा.

---

# पीकवाढीचे संजीवक

संकलन

**विकास मिरगणे, बालाजी देशमुख**

शेतीत अधिक उत्पादन, दर्जेदार फळधारणा आणि पिकांची सशक्त वाढ साध्य करण्यासाठी केवळ खत व पाणी पुरेसे नसते; तर वनस्पतींच्या वाढीला दिशा देणाऱ्या 'संजीवकां'ची (Plant Growth Regulators) महत्त्वाची भूमिका असते. वनस्पतींमध्ये नैसर्गिकरित्या तयार होणारी किंवा कृत्रिमरित्या तयार करून बाहेरून दिली जाणारी ही द्रव्ये पिकांच्या वाढीचे, फुलोऱ्याचे, फळधारणेचे आणि पक्वतेचे नियमन करतात. वापर आणि परिणामाच्या आधारे संजीवकांचे पाच प्रमुख प्रकार पडतात.

१) ऑक्झीन्स:ऑक्झीन्स ही संजीवके वनस्पतीमध्ये नैसर्गिकरित्या तयार होतात; तसेच त्यांची कृत्रिम निर्मितीही करता येते. या द्रव्यामुळे पिकांची वाढ जोमदार होते आणि पानगळ कमी होते. विशेषतः फळझाडांची छाटणी केल्यानंतर जखमेवर ऑक्झीन्सचा लेप दिल्यास त्या ठिकाणी अनावश्यक नवीन फुट येण्यास प्रतिबंध होतो. नॅपथॅलीन ॲसेटिक ॲसिड, इंडोल ॲसिटीक ॲसिड , इंडोल ब्युटेरिक ॲसिड यांचा या गटात समावेश होतो. २-४ डी व २-४-५ टी ही शक्तीमान कृत्रिम ऑक्झीन्स म्हणून ओळखली जातात.

२) जिबरेलीन:जिबरेलीन या गटात विविध प्रकार येतात. जिबरेलीक ॲसिडमध्ये 'जिबरेलीन' हे द्रव्य असते. द्राक्षाच्या मण्यांचा आकार वाढविणे, धान्याला मोड आणणे, फुलोरा येण्याइतकी पक्वता न आलेल्या झाडांना फुले आणणे, बियाण्यांची उगवण सुधारणा आणि सुप्तावस्थेतील डोळे फुटण्यासाठी जिबरेलीनचा वापर केला जातो. विशेष म्हणजे, जिबरेलीन आणि ऑक्झीन्सचा एकत्रित वापर केल्यास कमी बियांचे फळ उत्पादन साध्य करता येते, ज्यामुळे बाजारमूल्य वाढते.



३) सायटोकायनीन: ॲडनीन व सायटोकायनीन ही या गटातील नैसर्गिक वाढनियंत्रक द्रव्ये आहेत. सायटोकायनीनमुळे वनस्पतींच्या पेशी विभाजनास चालना मिळते. परिणामी फळधारणा सुधारते व फळांचा आकार वाढतो. काढणीनंतर भाज्या व फुले यांची ताजेपणा टिकून राहतो. प्रतिकूल परिस्थितीतही बियाण्यांची उगवण चांगली होण्यासाठी हे द्रव्य उपयुक्त ठरते.

४) इथिलीन: इथिलीन हा रंगहीन, जलद पेट घेणारा अतृप्त हायड्रोजन वायू आहे. इथरेल व इथेफॉन ही कृत्रिम संजीवके या गटात येतात. केळी, संत्रा, अननस यांसारखी फळे लवकर पिकविण्यासाठी इथरेलचा वापर केला जातो. इथेफॉनमुळे बागेतील सर्व फळे एकाच वेळी पिकण्यास मदत होते, ज्यामुळे काढणी व बाजारपेठेतील नियोजन सुलभ होते.

५) वाढ प्रतिबंधक (ग्रोथ इनहिबिटर्स): ही द्रव्ये वनस्पतींच्या काही अंतर्गत शारीरिक क्रियांना आळा घालतात. नैसर्गिकरित्या आढळणारी मॅलिक ॲसिड व बेन्झाईक ॲसिड यांचा या गटात समावेश होतो. वाढ नियंत्रणामुळे काही वेळा झाडांची अनावश्यक वाढ थांबवून ऊर्जा फळधारणेकडे वळविता येते. संजीवकांचा वापर हा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली, योग्य मात्रेत आणि योग्य टप्प्यावर करणे अत्यावश्यक आहे. चुकीचा किंवा अतिरेकी वापर पिकांसाठी हानिकारक ठरू शकतो. शास्त्रीय पद्धतीने व संतुलित वापर केल्यास संजीवके उत्पादनवाढ, दर्जा सुधारणा आणि आर्थिक लाभ वाढविण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात.

---

# राजकारण झाले आता अर्थकारणाचे बोल!

**राज्याने गेल्या चारेक वर्षात खूप राजकारण पाहिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या असून नगरपालिका, नगर पंचायती, महापालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमधील लोकनियुक्त व्यवस्था राज्याकडे निधीच्या आशेने पाहू लागेल.**

**रविकिरण देशमुख**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम संपल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा एक मोठा टप्पा संपलेला आहे. उर्वरित २० जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम जेव्हा यायचा तेव्हा येईल पण आता राज्याने अर्थकारणाला प्राधान्य देण्याची गरज आहे. राज्य सरकार २०२५-२६ या आर्थिक वर्षात किती कर्जाऊ रक्कम उभारू शकेल याची मर्यादा १.३० लाख कोटींहून अधिकची ठरली होती. ती जवळपास पूर्ण होत आल्याने राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटींच्या आसपास गेला आहे. नगरपालिका, नगर पंचायती, महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या येथील लोकनियुक्त व्यवस्था आता राज्याकडे निधीच्या आशेने पाहू लागेल. नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांना विकास कामांची घाई होणार हे ओघानेच आले.

राज्याचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प मार्चच्या पहिल्या आठवड्यात येत आहे. हा अर्थसंकल्प एरवीच्या अर्थसंकल्पापेक्षा वेगळा असेल अशी शक्यता आहे. याचे प्रमुख कारण आता राज्यात लगेचच निवडणुकांचा कार्यक्रम नाही. लोकानुनयी आणि मतदारांना आकर्षित करू शकतील अशा घोषणा करण्याचे बंधन सरकारवर नाही. उलट ज्या लोकानुनयी योजना सुरू आहेत त्याचा आढावा घेतला जाण्याची शक्यता वाढत चालली आहे. जुलै २०२४ मध्ये लाडकी बहीण योजना सुरू झाली तेव्हा २.४३ कोटी लाभार्थी महिलांना महिना १५०० रुपये देणे सुरू झाले. ती संख्या सध्या १.८८ कोटींच्या आसपास आली आहे. त्यात आणखी कपात होण्याची शक्यता अधिक आहे. एवढेच नव्हे तर महिला बचत गटांना अधिक प्राधान्य देण्याचे केंद्राचे धोरण असल्याने लखपती दिदी हा कार्यक्रम राज्यस्तरावर अधिक जोरकसपणे राबविला जाण्याची शक्यता आहे. तसे ठरले तर लाडकी बहिणचा फोकस तिकडे अधिक वळविला जाईल.

चालू आर्थिक वर्षात एकूण अर्थसंकल्पीत निधीच्या ६० टक्केच्या आसपासच निधी वितरीत झाला आणि त्यातही १०-१५ टक्के कमी खर्च झाला असे म्हटले जात आहे. म्हणजेच राज्य सरकारने खर्चात मोठी बचत केली आहे. सरत्या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन व विकास समित्यांना (डीपीडीसी) व आमदारांच्या स्थानिक विकास निधीला प्रत्यक्षात किती रक्कम वितरीत झाली याची राजकारणातल्या सर्व मंडळींना माहिती आहे पण त्यावर उघड चर्चा करण्याची तयारी आजवर कोणीही दाखविलेली नाही. याला सत्ताधारी पक्षाचा धाक म्हणावे की राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत असलेली कणव म्हणावी हा प्रश्नच आहे. सरकारला सुदैवाने फारच 'समंजस' विरोधी पक्ष लाभला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. विरोधक डीपीडीसी, आमदार निधी, रिझर्व्ह बँकेने अलीकडेच प्रकाशित केलेल्या राज्यांच्या आर्थिक अहवालाबाबत, हिवाळी अधिवेशनात 'कॅग'च्या अहवालात आर्थिक स्थितीबाबत काय म्हटले आहे याबाबत चर्चा करण्यास फारसे उत्सुक दिसत नाहीत. बोलून काय उपयोग, त्यापेक्षा सरकारला आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत काम करू द्यावे अशी 'सहिष्णू' भूमिका दिसते आहे. हे आत्यंतिक 'रचनात्मक' सहकार्याचे चिन्ह म्हणावे लागेल अशी स्थिती आहे.



१९९९ साली काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार आले. तेव्हा राज्यावरील कर्जाजा बोजा ४० हजार कोटींपेक्षा कमीच होता. तरीही राज्याची अर्थव्यवस्था फार गंभीर आहे असे चित्र निर्माण झाले होते. राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत तेव्हा श्वेतपत्रिका काढली गेली. शिवसेना-भाजपा युतीच्या सरकारने राज्य आर्थिक गाळात घातले असे सांगत सत्ताधारी आघाडीने युतीची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. पण विरोधी पक्ष बधला नाही. उलट सरकारवरचे हल्ले वाढले आणि तत्कालीन विरोधी पक्षनेते नारायण राणे व अर्थमंत्री जयंत पाटील यांची चकमक राज्याला पहायला मिळाली. २०१४ पर्यंत आघाडीचे सरकार होते व युती विरोधी बाकावर होती. पण सरकारला आर्थिक स्थितीहून वारंवार कोंडीत पकडले गेले. सभागृहात चर्चा होऊ शकली नाही तेव्हा विरोधी पक्षाच्या नेत्यांनी प्रमुख वृत्तपत्रात लेख लिहिले. त्याला अर्थमंत्र्यांनी उत्तर देणारे लेख लिहिले. आज अशी स्थिती निर्माण होण्याची शक्यताही कोणाला वाटणार नाही इतके वातावरण बदलले आहे. असो. राजकीय आघाडीवर कसेही वातावरण असले तर त्याला मुलामा देता येतो. पण आर्थिक बाबतीत सोंग करता येत नसते.

चालू आर्थिक वर्षात सरकारची महसुली तूट ४५ हजार कोटींच्या घरात राहील असा अंदाज होता. निवडणूक वर्षात ती वाढली की कमी झाली यासाठी अर्थसंकल्प सादर होईपर्यंत वाट पहावी लागणार आहे. सरकारची राजकोषीय तूट राज्याच्या एकूण सकल उत्पादनाच्या (जीडीपी) ३.३ टक्के झाली असल्याचे रिझर्व्ह बँकेचा अलीकडचा अहवाल सांगतो. अलीकडेच राज्य सरकारने दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या बैठकीत मोठे करार केले. त्यातील काही करार प्रत्यक्षात येण्यास सुरुवात झाली आहे. ही गुंतवणूक लवकर झाली तर राज्याच्या उत्पन्नात मोठी भर पडेलच शिवाय बेरोजगारी कमी झाली तर राज्य वाढत्या कर्जाच्या ओझ्याने अथवा तुटीच्या अर्थसंकल्पाने वाकून जाणार नाही. देशातील बेरोजगारीचा दर दोन वर्षांपूर्वी ३.२ टक्के होता. तो राज्याच्या बाबतीत ३.१ टक्के होता. वाढत्या गुंतवणुकीमुळे बेरोजगारी कमी झाली तर राज्याच्या क्रयशक्तीला आणखी चालना मिळेल. याचा लाभ राज्याच्या अर्थव्यवस्थेला होईल. अर्थव्यवस्थेत सुधारणा करून काही धाडसी निर्णय घेण्याची संधी राज्य सरकारकडे चालून आली आहे. निवडणुकांचा काळ जवळपास संपुष्टात आला असल्याने त्याकडे अधिक लक्ष दिले जाईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

मागे सरकारने एक निर्णय जाणीवपूर्वक घेतला होता. कोणताही सरकारी उपक्रम कर्ज काढो त्याला सरसकट सरकारी हमी दिली जात नव्हती. कारण तो उपक्रम कर्जाची परतफेड करू शकला नाही तर सरकारने त्याची परतफेड करायचे ठरवले तर अर्थव्यवस्था कोलमडून पडण्याची भीती असते. आता विकास कामांसाठी कर्ज काढताना सरकारला हमी द्यावी लागते. राज्य रस्ते विकास महामंडळ, राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आदींच्या विकास कामांना सरकारची हमी आहे. या विकास कामांतून आर्थिक परतावा ठरल्याप्रमाणे मिळण्यास विलंब झाला तर सरकारची हमी उपयोगात आणली जाण्याची शक्यता आहे. तेव्हा सरकार काय करेल, हा विषय पुढे येईल. समृद्धी महामार्ग, अटल सेतू, मुंबई मेट्रो, इतर मेट्रो प्रकल्प यातून किती उत्पन्न सुरू होईल याचे जे अंदाज होते त्याप्रमाणे ते मिळाले तर कर्जाची परतफेड व्यवस्थित होईल. अन्यथा सरकारला त्याची काळजी करावी लागेल. नजिकच्या भविष्यात वांद्रे-वर्सोवा सी लिंक, शक्तीपीठ महामार्ग, जनकल्याण मार्ग याची कामे सुरू होणार आहेत. त्यासाठी लागणाऱ्या कर्जाची हमी सरकारला स्वीकारावी लागेल. शिवाय महामार्गांच्या भूसंपादनाची रक्कम सरकार उपलब्ध करून देणार आहे. तो आकडाही मोठा असेल असा अंदाज आहे. सरकारने मोठी जोखीम पत्करली आहे, असे म्हटले तर चूक नाही.

राज्याने गेल्या चारेक वर्षात खूप राजकारण पाहिले. जून २०२२ साली सत्तेवर आलेल्या भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीला पहिल्या टर्ममध्ये पुन्हा सत्तेवर येण्यासाठी काही धाडसी निर्णय घ्यावे लागले. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा कार्यक्रम आला. राजकीय गोष्टी महायुतीने जशा ठरविल्या तशा घडत गेल्या आहेत. राजकारणात सोंगे घेता येतात. मात्र पैशाचे सोंग आणता येत नाही. आता राज्याच्या अर्थव्यवस्थेला आकार देण्याची आवश्यकता आहे.

---

# पुन्हा अण्वस्त्रांच्या दहशतीच्या छायेत...

**अक्षय निर्मळे**

हा करार प्राग येथे ८ एप्रिल २०१० रोजी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आणि दिमित्री मेदवेदेव यांनी केला. १० वर्षांनंतर पाच वर्षांची मुदतवाढ त्याला दिली गेली. करारानुसार दोन्ही देश जास्तीत जास्त १,५५० अण्वस्त्रे तैनात ठेवू शकत होते, तसेच जास्तीत जास्त ७०० तैनात क्षेपणास्त्रे व बॉम्बवर्षक विमाने ठेवू शकत होते. एकमेकांच्या अण्वस्त्र तळांवर प्रत्यक्ष तपासणी, अण्वस्त्रांबाबत नियमित माहितीच्या देवाणघेवाणीचे बंधन होते. करार संपल्याने ही पारदर्शकता संपली. आता दोन्ही देश दुसर्याच्या क्षमतेचा अंदाज गुप्तचर माहिती, संशयावरून घेत राहतील. अशी परिस्थिती नेहमीच संघर्षाला खतपाणी घालते.

युक्रेन युद्ध, नाटोचा विस्तार, आर्थिक निर्बंध, सीरिया आणि इतर जागतिक संघर्ष यावरून अमेरिका-रशियातील तणाव कमी-जास्त होत असतो. याशिवाय मध्यपूर्वेत इस्रायल-इराण-अमेरिका संघर्ष, तैवान-चीन तणाव इत्यादीमुळे जग आधीच अस्थिर आहे. या पार्श्वभूमीवर अण्वस्त्र नियंत्रणाचा शेवट म्हणजे अण्वस्त्र स्पर्धेला 'फ्री हँड' दिल्यासारखे आहे. यात आणखी एक नवा अँगल आहे तो चीनचा. आतापर्यंत अण्वस्त्र नियंत्रण हे प्रामुख्याने अमेरिका-रशिया यांच्यात मर्यादित होते; पण अलीकडच्या काळात चीनने वेगाने अण्वस्त्र साठा वाढवला आहे. महत्त्वाचे म्हणजे, चीन कोणत्याही करारात बांधिल नाही. त्यामुळे अण्वस्त्र स्पर्धा आता अमेरिका, रशिया, चीन अशी त्रिकोणी असेल. या स्पर्धेत भारत, पाकिस्तान, उत्तर कोरिया आणि राणसारख्या देशांचे अण्वस्त्र राजकारणही अप्रत्यक्षपणे परिणामकारक ठरू शकते. या पार्श्वभूमीवर जागतिक समुदायाची भूमिका महत्त्वाची असणार आहे. संयुक्त राष्ट्रे, युरोपियन संघ आणि मध्यम शक्ती असलेले देश केवळ चर्चा, निवेदने देऊन थांबू शकत नाहीत. नव्या बहुपक्षीय अण्वस्त्र नियंत्रण चौकटीची गरज आहे, ज्यात अमेरिका, रशिया आणि चीन तिघांनाही सहभागी व्हावे लागेल. अन्यथा अण्वस्त्र न वापरण्याचा अलिखित नियम टिकेल, याची खात्री देता येणार नाही.

न्यू स्टार्टचा अंत म्हणजे युद्ध अपरिहार्य झाले, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. अण्वस्त्र नियंत्रणाच्या चौकटीत जग काही प्रमाणात स्थैर्य अनुभवत होते. शीतयुद्ध काळातही अण्वस्त्र स्पर्धेला काही नियम, मर्यादा आणि पारदर्शकता होती; मात्र त्या चौकटीच कोसळत आहेत. नवीन युगात अण्वस्त्रे ही सामर्थ्याची प्रतीके झाली असतीलही; पण ती मानवी संस्कृतीच्या विनाशाची शक्यता बाळगणारे वास्तवदेखील आहे. एका चुकीच्या आकलनाने, एका तत्काळ प्रतिक्रियेतून किंवा एका तांत्रिक बिघाडाने इतिहास कायमचा बदलू शकतो. स्पर्धेच्या या वाटेवरून परत फिरून संवाद, विश्वास आणि सामूहिक जबाबदारीचा मार्ग स्वीकारणे हीच परिपक्वता असू शकते. अन्यथा अण्वस्त्रांच्या दहशतीची सावली नेहमीच पुढील पिढ्यांच्या भविष्यावर उमटत राहील.

# धाराशिव जिल्हा परिषदेत भाजपचे पारडे जड; 'मॅजिक फिगर'कडे वाटचाल

**धाराशिव (प्रतिनिधी): जिल्ह्याच्या राजकारणात जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीच्या पार्श्वभूमीवर हालचालींना वेग आला असून, सध्याच्या संख्याबळाच्या गणितात भाजपचे पारडे जड झाल्याचे चित्र दिसत आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये मतदारांनी महायुतीला स्पष्ट कौल दिला असला, तरी कोणत्याही एका पक्षाला स्वबळावर सत्ता स्थापनेसाठी आवश्यक बहुमत मिळालेले नाही. मात्र, उपलब्ध आकडेवारी भाजपसाठी अध्यक्षपदाची वाट अधिक सुलभ करत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.**

धाराशिव जिल्हा परिषदेत एकूण ५५ जागा असून, सत्ता स्थापनेसाठी 'मॅजिक फिगर' २८ आहे. निकालांनुसार महायुतीतील भाजप, शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मिळून ४० सदस्य निवडून आले आहेत. यात भाजप १९ सदस्यांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, तर शिंदेसेनेकडे १५ आणि राष्ट्रवादीकडे ६ सदस्य आहेत.

### विरोधकांचा 'अँटी-भाजप' फॉर्म्युला फिस्कटणार?

भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिंदेसेना, उद्धवसेना आणि काँग्रेस यांची संभाव्य आघाडी २६ पर्यंत पोहोचू शकते, असे गणित मांडले जात होते. मात्र, बहुमतासाठी आवश्यक २८ आकड्यापर्यंत पोहोचण्यासाठी अजूनही कसरत करावी लागणार असल्याने हा फॉर्म्युला प्रत्यक्षात कितपत यशस्वी ठरेल, याबाबत साशंकता व्यक्त होत आहे. एकूणच, अध्यक्षपदाच्या निवडीवेळी संख्याबळाची कसोटी लागणार असून, सत्तास्थापनेची दोरी कोणाच्या हाती राहते याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. आगामी राजकीय हालचालींमुळे धाराशिव जिल्हा परिषदेत सत्तासमीकरणे अधिक रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.

राजकीय घडामोडींमध्ये माजी मंत्री तथा शिंदेसेनेचे आमदार तानाजी सावंत यांनी 'टँगा पलटी'ची भूमिका व्यक्त केल्याची चर्चा असतानाच भाजपने आपली बाजू भक्कम करण्यासाठी पर्यायी रणनीतीवर काम सुरू केल्याचे संकेत मिळत आहेत. भाजपचे १९ सदस्य, १ पुरस्कृत अपक्ष, राष्ट्रवादीचे ६ आणि समाजवादी पक्षाच्या १ सदस्याची साथ मिळाल्यास २८ चा बहुमताचा आकडा गाठणे शक्य असल्याचे गणित मांडले जात आहे.

या पार्श्वभूमीवर संभाव्य फुट टाळण्यासाठी विविध पक्षांकडून सदस्यांना सुरक्षित स्थळी हलविणे, सहलींचे आयोजन अशा हालचालींना उधाण आले आहे. काही सदस्यांनी स्थैर्याच्या दृष्टीने भाजपसोबत राहण्यास प्राधान्य दिल्याचीही चर्चा आहे.

## खरीप २०20 पीक विम्याचे रु. १३४ कोटी शेतकऱ्यांना मिळणार

### धाराशिवच्या शेतकऱ्यांना पैसे मिळण्यासाठी महत्वाचे पाऊल-आ.राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (प्रतिनिधी): खरीप २०२० हंगामातील पीक विम्याच्या प्रतीक्षेत असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांचा अखेर विजय झाला आहे. जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काच्या लढ्याला निर्णायक यश मिळाले आहे. महायुती सरकारने १३४ कोटी ११ लाख ९१ हजार ९३८ रुपये इतका निधी धाराशिवच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यास अंतिम मान्यता दिली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर ही रक्कम जमा केली जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

खरीप २०२० मध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. मात्र, तांत्रिक कारणांमुळे विमा कंपन्या नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करत होत्या. याविरोधात आपण शेतकरी बांधवांच्या सहकार्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने २४ नोव्हेंबर २०२५ आणि १८ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या महत्त्वपूर्ण आदेशानुसार, विमा कंपनीचा दुसरा हप्ता रोखून तो थेट शेतकऱ्यांना देण्याचे निर्देश दिले होते.

याच आदेशाची अंमलबजावणी करत, आपल्या महायुती सरकारने बुधवार ११ फेब्रुवारी रोजी शासन निर्णय जारी केला आहे. त्यानुसार धाराशिव जिल्ह्यासाठी १३४ कोटी ११ लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. १३४.११ कोटींचा हा निधी कृषी आयुक्तालयाच्या ES-CROW बँक खात्यातून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांना वर्ग केला जाणार आहे. बजाज अलियांज विमा कंपनीने न्यायालयात जमा केलेले ७५ कोटी रुपये आणि त्यावरील व्याजही पात्र शेतकरी बांधवांना वितरित करण्यासाठी वापरले जाणार आहे. त्याची सुनावणी उद्या न्यायालयात होणार आहे. त्याकडेही आपले लक्ष असून त्याबाबतही सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे. जिल्ह्यातील बाधित शेतकरी बांधवांच्या हक्कासाठी आपला सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरूच आहे. मागील पाच वर्षांपासून आपण शेतकरी बांधवांच्या सोबतीने सलग जिल्हा प्रशासनाकडे आणि न्यायालयात पाठपुरावा करत होतो. अगदी सर्वोच्च न्यायालयानेही विमा कंपनीची याचिका फेटाळल्या मुळे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीक विम्याचा मार्ग मोकळा झाला होता. आता प्रत्यक्ष निधी वर्ग करण्याचा शासन निर्णय निघाल्याने हजारो शेतकरी बांधवांना दिलासा मिळणार असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

## शेतकऱ्यांच्या चिकाटीचा विजय; खरीप २०२० पीकविम्यास १३४.११ कोटींची मंजुरी-आ.पाटील



धाराशिव (प्रतिनिधी): खरीप हंगाम २०२० मधील पीकविमा भरपाईप्रकरणी राज्य शासनाने अखेर तब्बल १३४.११ कोटी रुपये पात्र शेतकऱ्यांना वितरित करण्यास मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे धाराशिव जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना हेक्टरी ९ हजार रुपये विमा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, दीर्घकाळ चाललेल्या न्यायालयीन आणि रस्त्यावरच्या संघर्षाला यश मिळाल्याची भावना धाराशिव कळंबचे आमदार कैलास पाटील यांनी व्यक्त केल्या आहेत.

खरीप २०२० दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असताना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ होत असल्याच्या तक्रारी होत्या. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी हक्काच्या पीकविम्यासाठी तीव्र आंदोलन छेडले. आमरण उपोषणासह विविध मार्गांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. या संघर्षानंतर पात्र शेतकऱ्यांची संख्या १,६९,०८६ वरून ३,५३,४९९ इतकी वाढल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विमा कंपनीविरोधात अवमान याचिका दाखल करून कंपनीचे बँक खाते गोठविण्याचे आदेश दिले होते. पुढे उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आल्या. दि. ०६ मे २०२२ रोजी उच्च न्यायालयाने पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले होते. दरम्यान, विमा कंपनीने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केल्या; मात्र त्या फेटाळण्यात आल्या. त्यानंतर उच्च न्यायालयाने विमा कंपनीला निधी राज्य सरकारकडे जमा करण्याचे आदेश दिले. न्यायालयीन प्रक्रियेनंतर राज्य शासनाकडील विमा हप्त्याचा दुसरा भाग थेट शेतकऱ्यांच्या भरपाईसाठी वापरण्याचा मार्ग मोकळा झाला. त्याअनुषंगाने राज्य शासनाने १३४.११ कोटी रुपये वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. हा निर्णय शेतकऱ्यांच्या चिकाटीचा आणि संघटित लढ्याचा विजय असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. खरीप २०२० मध्ये नुकसान झालेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीकविमा भरपाई मिळावी, यासाठी पाठपुरावा सुरूच राहील, असे धाराशिव-कळंबचे आमदार कैलास पाटील यांनी सांगितले.

## ठाकरे सेना उपतालुका प्रमुखाच्या शेतात ४८५ किलो अफू

### वाशी तालुक्यातून पाऊण कोटीचा अफू जप्त!

धाराशिव : ठाकरे सेना वाशी उप तालुकाप्रमुख असलेल्या समाधान उघडे याच्या शेतात कांद्याच्या पिकात लपवून अफूचा काळा धंदा सुरु असल्याची खळबळजनक बाब उघडकीस आली आहे. पोलिसांनी हा सगळा प्रकार चव्हाट्यावर आणला आहे. वाशी तालुक्यातील दशमेगाव शिवारातून पाऊण कोटींची अफूची रोपे पोलिसांनी जप्त केली आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई करीत अफूची शेती करणाऱ्या ठाकरे उप तालुका प्रमुखाला मोठा दणका दिला आहे.



बुधवार ११ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक रितू खोखर यांना वाशी तालुक्यातील मौजे दशमेगाव येथे एका शेतकऱ्याने चोरून अफूची लागवड केल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीची गांभीर्याने दखल घेत, त्यांनी तातडीने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांना कारवाईचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दशमेगाव येथील सर्वे क्र. १६३ मध्ये बुधवारी छापा टाकला. यावेळी पोलिसांना धक्कादायक दृश्य पाहायला मिळाले.

संशयित आरोपी समाधान मनोहर उघडे याने आपल्या शेतात कांद्याच्या पिकात आंतरपीक म्हणून मोठ्या प्रमाणावर अफूची लागवड केली होती. या झाडांना पांढऱ्या-गुलाबी रंगाची फुले आणि मोठी बोंडे आलेली होती. नायब तहसीलदार किसन सांगळे आणि दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी शेतातून एकूण ४८५ किलो वजनाची अफूची झाडे उपटून जप्त केली आहेत. अंदाजे ७२ लाख ८४ हजार ७५० रुपये किमतीची जप्त करण्यात आली आहेत.

विनापरवाना आणि स्वत:च्या फायद्यासाठी ही अमली पदार्थांची शेती केल्याप्रकरणी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा उप तालुकाप्रमुख समाधान उघडे याच्या विरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना आणि प्रशिक्षणार्थी भापोसे अधिकारी मेघना आय.एन. यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलिस निरीक्षक सुदर्शन कासार, यशवंत घोडके आणि इतर पोलीस अंमलदारांचा समावेश होता. या कारवाईमुळे जिल्ह्यात अवैध अमली पदार्थ उत्पादकांचे धाबे दणाणले असून, पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मृत्यूच्या दारातून मातेला दिले जीवदान धाराशिव मेडिकल कॉलेज ठरले देवदूत

धाराशिव : येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने आपल्या तत्पर सेवा आणि कुशल डॉक्टरांच्या मदतीने एका महिलेला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले आहे. अत्यंत गुंतागुंतीच्या प्रकृतीमुळे जीवन-मरणाची लढाई लढणाऱ्या या मातेवर यशस्वी उपचार करून धाराशिवचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय 'देवदूत' असल्याची प्रचिती पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.



सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर अमृता यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यामध्ये 'हेल्प सिंड्रोम' आणि 'डीआयसी' सारख्या जीवघेण्या गुंतागुंती निर्माण झाल्या होत्या. शरीरातील रक्त गोठण्याची प्रक्रिया थांबल्यामुळे सतत रक्तस्राव होत होता आणि त्यांचा रक्तदाबही कमालीचा कमी होऊन ७०/३० पर्यंत खाली घसरला होता.व्हेंटिलेटरवर असलेल्या अमृता यांच्या जगण्याची आशा नातेवाईकांनीही सोडली होती. अशावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेन्द्र चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रीरोग विभागाच्या प्रमुख डॉ. ज्योती डावळे व त्यांच्या पथकाने तातडीने उपचार सुरू केले. अतिदक्षता विभागातील तज्ज्ञांच्या समन्वयामुळे रुग्णाला स्थिर करण्यात यश आले. या यशस्वी मोहिमेत डॉ. किरण देशमुख, डॉ. शांतनू पाटील, डॉ. डुमणे, डॉ. जामदार आणि त्यांच्या संपूर्ण टीमने अहोरात्र परिश्रम घेतले. केवळ ही एकच रुग्ण नव्हे, तर मागील वर्षभरात या रुग्णालयाने वैद्यकीय क्षेत्रात मोठे टप्पे गाठले आहेत. १५० हून अधिक गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रिया यशस्वी केल्या आहेत. लॅप्रोस्कोपिक आणि ओपन अशा दोन्ही पद्धतींच्या शस्त्रक्रियाही याठिकाणी आजघडीला उपलब्ध आहेत. तसेच उच्च जोखमीच्या प्रसूतींचे उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे एका तरुण मातेचे प्राण वाचवल्याबद्दल सर्व स्तरांतून रुग्णालयाचे कौतुक होत आहे. आधुनिक सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांमुळे धाराशिवचे शासकीय रुग्णालय आता सर्वसामान्यांसाठी मोठा आधारवड ठरत आहे.

## धाराशिवचे पुत्र पोलीस उपनिरीक्षक अराफत सिद्दीकी यांचा मुंबईत डंका

### धडाकेबाज कामगिरीबद्दल पोलीस उपायुक्तांच्या हस्ते विशेष गौरव

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) - धाराशिव शहरातील रहिवासी तसेच धाराशिव शहर छेडछाड पथकातील पोलीस कर्मचारी व सध्या मुंबई येथे ऐंशीशपीं विभागात पोलिस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले अरफत सिद्दीकी यांनी गुंडगिरी मोडून काढण्यासाठी केलेल्या धडाकेबाज कामगिरीबद्दल पोलीस उपायुक्त आर. रागसुधा यांनी प्रमाणात देऊन विशेष सत्कार करुन गौरव केला. दरम्यान, धाराशिव जिल्ह्याचे नाव उज्वल करण्याचे काम त्यांच्या माध्यमातून होत आहे हे विशेष.



अरफत सिद्दीकी हे धाराशिव शहरातील रहिवासी असून ते २००८ मध्ये धाराशिव पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झाले. त्यांनी महिला छेडछाड प्रतिबधक पथकामध्ये तत्कालीन पोलीस पथक प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक माया पानसे यांच्या समवेत धडाकेबाज कामगिरी केली. या सेवेत कार्यरत असतानाच त्यांनी २०१६ मध्ये महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा (एमपीएससी) दिली. ते उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना नाशिक येथे २०१८ मध्ये प्रशिक्षण देण्यात आले. तर डोंगरी पोलिस ठाण्यात २०१९ - २२ व जे जे मार्ग पोलीस ठाणे मुंबई येथे त्यांनी पोलिस उप निरीक्षक काम पाहिले. तसेच ते २०२४ पासून अंतापहिल पोलीस ठाण्यात अंमलबजावणी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या धडाकेबाज कारवाईमध्ये कोणत्याही प्रकारचा खंड पडू दिलेला नाही. त्यांनी ३०० पेक्षा जास्ती प्रतिबंधात्मक कारवाई करीत १० गुंडांना तडीपार केले आहे. तर एका अट्टल गुंडाला महाराष्ट्र धोकादायक क्रियाकलाप प्रतिबंधक कायदा, १९८१ (एमपीडीए) कायद्यांतर्गत धडक कारवाई करीत त्याला एका वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे. या धडाकेबाज कामगिरीबद्दल सिद्दीकी यांच्यासह त्यांच्या पथकातील हेड कॉन्स्टेबल सानप, दहिफळे, पोलीस कॉन्स्टेबल राथोड, सपकाळ यांचा प्रमाणपत्र देऊन विशेष सत्कार करुन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यामुळे धाराशिव शहराचे नाव उज्वल करण्याचे काम करणाऱ्या सिद्दीकी यांच्या या अभिमानास्पद कामगिरीचे सर्व स्तरातून स्वागत व अभिनंदन होत आहे.

## अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची तज्ञ पथकाने केली पाहणी

### शेतकऱ्यांशी संवाद, केंद्राला अहवाल देणार

धाराशिव - सन २०२५ मधील अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती नंतरच्या गरजांचे मूल्यांकन (PDN) करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या तज्ज्ञांचे पथक केंद्रीय पथक प्रमुख श्री.सी.पी.मोहन यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात आज दाखल झाले.या पथकाने बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी करत शेतकरी व ग्रामस्थांच्या वेदना जाणून घेतल्या व सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची पाहणी केली.

भूम तालुक्यातील चिंचपूर (ढगे) गावाजवळ श्री.सी.पी.मोहन यांनी भारत मोरे,चंद्रकांत मोरे व अमरसिंह ढगे यांच्या शेतीची पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करून सविस्तर माहिती घेतली. पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे पिके, शेती जमीन आणि बांध बंदिस्तीचे झालेले नुकसान पाहून त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

बाधित शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीची माहिती यावेळी श्री.मोहन यांना दिली. यावेळी भूम उपविभागीय अधिकारी रेवैयाह डोंगरे,तहसीलदार जयवंत पाटील, तालुका कृषी अधिकारी अतुल ढवळे, मंडळ अधिकारी प्रवीण पारखे व ग्राम महसूल अधिकारी श्रीमती एस.के.खोत प्रामुख्याने उपस्थित होत्या.

चिंचपूर येथील कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे तसेच वालवड येथील पाझर तलावाचे पुरामुळे झालेले नुकसानही पथकाने पाहिले.पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.मदने यांनी झालेल्या नुकसानीची माहिती दिली.

बेलगाव येथील विश्वनाथ दातखिळे यांच्या शेतातील गोठ्यात बांधलेल्या १८ गाई पुरात मृत्युमुखी पडल्या,तर २० बकऱ्या पुराच्या पाण्यात वाहून गेल्या.जनावरांचा चारा,दूध काढण्याची



मशीन,गोठा,शेणखत व कडबा कटरही पुरामुळे वाहून गेल्याची व्यथा श्री.दातखिळे यांनी पथका समोर मांडली.या घटनेमुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबावर कोसळलेले दु:ख आणि उपजीविकेवर आलेले संकट प्रकर्षाने समोर आले.परंडा तालुक्यातील आवार पिंपरी गावालाही केंद्रीय पथकातील सदस्य श्रीमती आशा राणी व श्री.मिकी मेकॉन डलबेरा यांनी भेट दिली.गावाजवळून वाहणाऱ्या उल्फा नदीला आलेल्या पुरामुळे नुकसान झालेल्या शाळा,अंगणवाडी इमारत व ग्रामपंचायतीच्या आरओ प्लांटची पाहणी करून त्यांनी शाळेचे मुख्याध्यापक शहाजी गावटे,अंगणवाडी सेविका,ग्रामसेवक तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली.


## तहसील कार्यालय, कळंब

**बार्शी रोड कळंब, पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र.०२४७३@२६२२५४ Email id-tahkalamb@gmail.com
(संकलन विभाग-दंडणीय)

जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावी- दिनंक २८/०१/२०२५

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब ता.कळंब जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब यांचेमार्फत श्री.अशोक आदिनाथ त्रिमुखे रा.कळंब ता.कळंब जि.धाराशिव यांनी त्यांचे स्वत:चे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ. कळंब ता.कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे कळंब ता.कळंब जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०१/१०/१९७१ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी, न.प. कळंब यांनी दि.१५/०१/२०२६ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

## तहसील कार्यालय, कळंब

**बार्शी रोड कळंब, पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र.०२४७३@२६२२५४ Email id-tahkalamb@gmail.com
(संकलन विभाग-दंडणीय)

जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावी- दिनंक २८/०१/२०२५

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब ता.कळंब जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब यांचेमार्फत श्री.मुस्तफा मंजुर मनियार रा.कळंब ता.कळंब जि.धाराशिव यांनी त्यांचा भाऊ मुस्तईद मंजुर मनियार यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ. कळंब ता.कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे कळंब ता.कळंब जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०२/०७/१९८३ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी, न.प. कळंब यांनी दि.१५/०१/२०२६ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

## नगर परिषद उमरगा
### जाहीर निविदा सूचना-२०२६

जा.क्र-नपतु/स्व.वि/निविदा//२०२६ दि १२/०२/२०२६

सर्व नोंदणीकृत मान्यता प्राप्त ठेकेदार यांना कळविण्यात येते की, नगरपरिषद उमरगा अंतर्गत उमरगा शहरातील मोकाट कुत्रे पकडून त्यांना निर्बीजीकरण करणे, व श्वान यांना पकडून नगरपरिषदेच्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करणे या कामाची जाहीर प्रसिद्धीकरण करून निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुकांनी आपली निविदा दि. १२/०२/२०२६ ते दि. २०/०२/२०२६ रोजी साय ०५:०० वा पर्यंत सादर करावीत. तसेच कामाची निविदा उघडणे दि. २३/०२/२०२६ रोजी दु. ११:०० वा उघडण्यात येईल. सदरील कामाबाबतीत इतर अटी व शर्ती ऑनलाइन https://mahatenders.gov.in/ या वेब साइट वर पहावयास मिळतील.

टोल फ्री क्र. फोन नं. १८००२३३११५६.
ई-मेल ल :-npumarga@gmail.com

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद उमरगा**

CMYK







# नवीन कामगार कायदे तात्काळ रद्द करा

## लातुरात शहरातील विविध कामगार संघटनांचे केंद्र सरकारविरोधात आंदोलने

**लातूर दि. १२ (प्रतिनिधी) : 'इज ऑफ डूइंग बिजनेस' च्या नावाखाली भांडवलदारांना उद्योग करताना कामगारांचे अधिकाधिक शोषण करून अधिक नफा वसूल करता यावा या उद्देशाने आजपर्यंत संघर्ष करून मिळविलेले वेगवेगळे कामगार कायदे रद्द करून नवीन चार कामगार कायदे या शासनाने आणलेले आहेत. 'चार कामगार कायदे' कामगारांच्या हिताची असल्याचे सरकारकडून अनेकदा सांगण्यात येत आहे परंतु कुठल्याही क्षेत्रातील कामगारांनी या कामगार कायद्यांची मागणी केलेली नाही तसेच प्रत्येक क्षेत्रातून या नवीन कामगार कायद्यांना विरोध होतो आहे. केंद्रातील मोदी सरकारने कामगारांचे हक्क आणि अधिकार असलेले २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे केलेत. हे नवीन चार कायदे कामगारांना व कर्मचाऱ्यांना गुलाम बनवणारे असल्याने ते त्वरित परत घ्यावेत. या व अन्य विविध मागण्यासाठी १२ फेब्रुवारी रोजी विविध कामगार संघटनानी देशभर संप पुकारला होता. त्याचाच भाग म्हणून अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना च्या वतीने जुने जिल्हाधिकारी कार्यालय, येथे विराट मोर्चा काढण्यात आला. तर दुसरीकडे बँक कर्मचाऱ्यांनी बँकेसमोर थांबून निदर्शने केली.**

कष्टकरी, श्रमिक व कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मोचार्चे नेतृत्व अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी केले. मोदी सरकारने कामगारांच्या हिताचे तब्बल 29 कायदे रद्द करून चार नवीन कायदे केले आहेत. त्यामुळे कामगार वर्गाचे मोठे नुकसान होणार आहे. कामगारांची पिळवणूक करून त्यांना उध्वस्त करण्याचा डाव भाजप सरकारचा आहे. घरेलू कामगार, बांधकाम कामगार, माथाडी कामगार, कंत्राटी कामगार यांच्या हक्क आणि अधिकारांचे रद्द केलेले 29 कामगार कायदे पुन्हा प्रस्थापित करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, कामाच्या तासांत वाढ करू नये, कायम स्वरूपी बारमाही कामामध्ये कंत्राटी कामगार पद्धत बंद करण्यात यावी, सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उद्योग, सेवा उद्योग, नगरपालिका, महानगर पालीका अशा ठिकाणी अस्थाई वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटी, हंगामी, रोजदारी, मानधनावरील कामगाराना/कर्मचाऱ्यांना विनाअट कायम करण्यात यावे, लोकशाही व स्वातंत्र्य हिरावून घेणारा महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा रद्द करण्यात यावा, नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्याना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सहाय्य योजनेत कोणताही बदल न करता त्या पूर्ववत चालू ठेवावे आदी मागण्या मोर्चाद्वारे करण्यात आल्या.

'इज ऑफ डूइंग बिजनेस' च्या नावाखाली भांडवलदारांना उद्योग करताना कामगारांचे अधिकाधिक शोषण करून अधिक नफा वसूल करता यावा या उद्देशाने आजपर्यंत संघर्ष करून मिळविलेले वेगवेगळे कामगार कायदे रद्द करून नवीन चार कामगार कायदे या शासनाने आणलेले आहेत. 'चार कामगार कायदे' कामगारांच्या हिताची असल्याचे सरकारकडून अनेकदा सांगण्यात येत आहे परंतु कुठल्याही क्षेत्रातील कामगारांनी या कामगार कायद्यांची मागणी केलेली नाही तसेच प्रत्येक क्षेत्रातून या नवीन कामगार कायद्यांना विरोध होतो आहे तरीसुद्धा केवळ भांडवलदारांना व परकीय गुंतवणुकीला येथील उद्योगांमध्ये कामगारांचे शोषण करून अधिकाधिक नफा मिळविता यावा केवळ या एका उद्देशाने सरकारने देशभरातील सर्व संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारावरती हे कायदे लादलेले आहेत. अगदी ब्रिटिश काळापासून कामगारांनी संघर्ष करून वेगवेगळे अधिकार व हक्क मिळवलेले आहेत. त्यामुळे कामगार सध्या उपभोगत असलेले अधिकार व हक्क हे कुठल्याही सरकारने मेहरबानीने कामगारांना दिलेले नसून कामगारांच्या प्रदीर्घ संघषार्तून त्यांनी ते मिळविलेले आहेत. पाशवी बहुमताच्या जोरावर सरकारला हे वाटत आहे की आपण आजपर्यंत संघषार्तून मिळवलेले अनेकांचे या प्रकारचे अधिकार सहजरित्या बदलून आपणास हवे ते कायदे आपण यांच्यावरती लादु शकतो परंतु कामगारांच्या एकजुटीचा व कामगारांच्या ताकदीचा या सरकारला कुठलाही अंदाज नाही. कामगार विरोधी असलेले हे कायदे तात्काळ भारत सरकारने मागे घ्यावे अन्यथा कामगार वर्गास भारतातील प्रत्येक क्षेत्राची चाके थांबविण्याची क्षमता नाईलाजाने वापरावी लागेल हे शासनाने ध्यानात घ्यावे असा इशारा बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड धनंजय कुलकर्णी यांनी दिला.

नवीन कामगार कायद्यामुळे युनियन स्थापन करणे, संप आयोजित करणे,सक्षम नवीन नेतृत्व निर्माण करणे या सर्व गोष्टी अधिकाधिक कठीण केल्या जात आहेत. कामाचे अनिश्चित तास व कामगारांना कामावरून काढून टाकण्यासाठी अनेक क्लिष्ट परवानग्यांची गरज नसणे यासारख्या अनेक कामगार विरोधी गोष्टी अंतर्भूत केल्या जात आहेत ज्याला आपण एक दिलाने व संपूर्ण ताकतीने विरोध करायला हवा म्हणूनच आजचा संप हा अटळ बनलेला आहे असे बँक कर्मचाऱ्यांचे युवा नेते कॉम्रेड दीपक माने यांनी कर्मचाऱ्यांना संबोधित करताना म्हटले.

सरकारने खाजगीकरणाचे हे धोरण तात्काळ थांबवावे अन्यथा कामगारांना बेमुदत संपावर जावे लागेल असा इशारा विमा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड कमलाकर एचवाड यांनी दिला.

याचा निषेध म्हणून आज आम्ही संपामध्ये उतरलो आहोत असे महाराष्ट्र स्टेट बँक एम्पलोयीज फेडरेशन अध्यक्ष कॉम्रेड धनंजय कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.



## राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेकडून धरणे सत्याग्रह निवेदन

**लातूर दि. १२ (प्रतिनिधी) :** सरकारी व निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष बी.बी. गायकवाड, कार्याध्यक्ष महादेव पांचाळ, उपाध्यक्ष आर.एस.तांदळे, महसूल संघटनेचे दत्तात्रय सूर्यवंशी व अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत प्रलंबित विविध मागण्याचे धरणे सत्याग्रह निवेदन लातूर येथील निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तत्काळ जारी करण्यात यावी, सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत समस्यांवर मा. मुख्यमंत्री स्तरावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी, दोन महिन्यांतून एकदा चर्चासत्राचे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात यावे, दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच वस्तीशाळा शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी तत्काळ उठवा. १०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा, राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीचा सन २००५ पासूनचा आकृतीबंध तयार करण्यात यावा.सरकारी कर्मचाऱ्यांवर कर्तव्य बजावत असताना होणाऱ्या भ्याड हिंसक हल्ल्यांविरुध्द कडक कारवाई व्हावी यासाठी आयपीसी कलम ३५३ मध्ये दुरुस्ती करुन कलम ३५३ अजामिनपात्र करण्यात यावे. करावी. सेवानिवृत्तीचे वय ६० करा. यासह आदी कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत.

# डॉ. सोमवंशी यांना समाज कल्याण सभापती करा

## समाजसेवेची जाण आणि भान असल्याने कार्यकर्त्याची मागणी

**उदगीर दि. १२ (प्रतिनिधी) :** तालुक्यातील निडेबन जिल्हा परिषद गटातून प्रचंड बहुमत घेऊन विजयी झालेले राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार डॉ. दीपक सोमवंशी यांना जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण सभापती पदी काम करण्याची संधी द्यावी. अशा पद्धतीची मागणी निडेबन जिल्हा परिषद गटातील अनेक गावातील कार्यकर्त्यांनी केली आहे. निवडणुकीच्या दरम्यान उच्च विद्याविभूषित असलेल्या डॉ. दीपक सोमवंशी यांना विजयी करा, या भागाचा निश्चित विकास होईल. अशी शाश्वती आमदार संजय बनसोडे यांनी दिली होती.



या विकासाला गती येण्यासाठी डॉ. दीपक सोमवंशी यांना सभापती पद द्यावे. समाजसेवेची जाण आणि भान असलेले हे नेतृत्व आहे. गोरगरिबांची खऱ्या अर्थाने सेवा करतील, गरिबांवर कुठेही अन्याय होऊ देणार नाहीत. अशा पद्धतीचे हे व्यक्तिमत्व असून निस्वार्थ भावनेने आणि निपक्षपातीपणे ते काम करतील. याची खात्री लोकांना आहे. 9200 हून अधिक मते त्यांनी मिळवली आहेत. यावरूनच त्यांची लोकप्रियता लक्षात येते. रुग्णसेवेच्या माध्यमातून त्यांनी आजपर्यंत हजारो लोकांना जीवदान दिले आहे.

अनेकांच्या सुखदुखात डॉ. दीपक सोमवंशी हे सहभागी झाले आहेत. ही त्यांची सामाजिक बांधिलकी विचारात घेऊन, त्यांना जर जिल्हा परिषदेमध्ये समाज कल्याण सभापती पदावर काम करण्याची संधी दिली, तर ते निश्चितच या संधीचे सोने करतील. असा विश्वास कार्यकत्यार्तून व्यक्त केला जात आहे. या संदर्भामध्ये कार्यकर्ते आ. संजय बनसोडे यांची भेट घेणार असून, आपल्या नेत्यासाठी आग्रही मागणी करणार असल्याची चर्चा आहे.

## दयानंद महाविद्यालयात १२ वी बोर्ड परीक्षा सुरळीत चालू

**लातूर दि. १२ (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावी वर्गाच्या परीक्षेला सुरुवात झाली. दयानंद वाणिज्य महाविद्यालय या केंद्रावरती विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या विद्यार्थी परिक्षार्थीनी इंग्रजी विषयाची परीक्षा दिली. ही परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडली.

दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ .जयप्रकाश दरगड आणि महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे परीक्षेसाठी स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रा.ऋतुजा देशमुख, समन्वयक डॉ. सुभाष मोरे परीक्षा केंद्रप्रमुख प्रा. सिद्धेश्वर ठाकूर ,कार्यालयीन अधीक्षक श्री. फैयाजखान पठाण , शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# महापौरांनी घेतला कामकाजाचा आढावा

## श्री सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने विविध विभागांना सूचना



**लातूर दि. १२ (प्रतिनिधी) :** लातूरच्या नवनिर्माचित महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे व उपमहापौर स्नेहल उटगे यांनी गुरुवारी (दि.१२) मनपातील अधिर्कायांकडून कामकाजाचा आढावा घेतला. रविवारपासून सुरू होणारी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने त्यांनी विविध सूचनाही केल्या.

महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी व उपमहापौर स्नेहल उटगे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत प्रारंभिक अधिकाऱ्यांचा व विभाग प्रमुखांचा परिचय करून देण्यात आला.नूतन महापौर व उपमहापौरांनी मनपाचे कामकाज समजून घेतले. पाणीपुरवठा, पथदिवे, अग्निशमन,आरोग्य तसेच सर्व विभागांची माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली.

महाशिवरात्री निमित्त रविवार दि.१५ फेब्रुवारी पासून ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेला सुरुवात होत आहे.या यात्रेच्या अनुषंगाने मनपाच्या वतीने केल्या जाणाऱ्या तयारीचा आढावाही महापौरांनी घेतला. यात्रेत मनपाच्या वतीने पाण्याचे टँकर भरून दिले जाते. त्याबाबत माहिती घेतली. यात्रा परिसर व यात्रा मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, पथदिव्यांची दुरुस्ती याबाबतही त्यांनी सूचना केल्या. यात्रा परिसरात गरज पडली तर अग्निशमन दल सेवा तत्पर असावी, असेही महापौरांनी सांगितले. यात्रेच्या अनुषंगाने जे-जे करणे आवश्यक आहे त्या सर्व बाबी प्राधान्याने कराव्यात,असे त्या म्हणाल्या.

दि. १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व परिसराची स्वच्छता, आवश्यक तेथे डागडुजी व सुशोभीकरण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

या बैठकीस गट नेते विजयकुमार साबदे,नगर सेवक धोंडिराम यादव, सचिन गायकवाड,अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त वसुधा फड, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश

## किल्लारी क्र. २ बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी १.८६ कोटींचा निधी मंजूर

**औसा दि. १२ (प्रतिनिधी) :** औसा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत शासनाने तेरणा नदीवरील किल्लारी क्र. २ (लातूर पद्धती) बंधाऱ्याच्या यांत्रिकी व विद्युत घटकांच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ८६ लाख रुपयांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर झाल्याचे सांगितले जात आहे. धरण सुरक्षितता आणि सुलभ द्वार परिचालनाच्या दृष्टीने ही दुरुस्ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

किल्लारी क्र. २ बंधारा हा लातूर जिल्ह्यातील किल्लारी क्र. २ गावाजवळ तेरणा नदीवर उभारण्यात आला असून, तो तेरणा धरण स्थळापासून सुमारे २५.०५ कि.मी. अंतरावर आहे. या बॅरेजचा एकूण संकल्पित पाणीसाठा १.३०४ दशलक्ष घनमीटर असून १९४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची क्षमता आहे. सन २०१५ मध्ये हा प्रकल्प पूर्ण झाला आणि त्याच वर्षी प्रथमच पाणी साठविण्यात आले. त्यानंतर सन २०१९ मध्ये प्रकल्प व्यवस्थापन विभागाकडे देखभाल व द्वार परिचालनासाठी हस्तांतरित करण्यात आला.मात्र प्रकल्प पूर्ण झाल्यापासून बंधाऱ्यातील द्वारे व उच्चालक यंत्रणेची आवश्यक दुरुस्ती झालेली नव्हती. मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांनी दि. १२ सप्टेंबर २०२३ रोजी मांजरा नदी खोऱ्यातील विविध बंधारे व बॅरेजची पाहणी केली असता, यांत्रिकी व विद्युत घटकांच्या दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. त्यामध्ये किल्लारी क्र. २ बंधाऱ्याचाही समावेश करण्यात आला होता.

महामंडळ स्तरावर निधी उपलब्ध नसल्यामुळे ही कामे विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्तावित करण्यात आली होती. आ. अभिमन्यू पवार यांनी यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर शासनाने १.८६



कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली.या दुरुस्तीमुळे बंधाऱ्याच्या द्वारांतून होणारी पाण्याची गळती थांबणार असून संपूर्ण पाणीसाठा प्रभावीपणे उपलब्ध होईल. परिणामी रब्बी व उन्हाळी हंगामात सिंचनासाठी आवश्यक पाणी पूर्ण क्षमतेने उपलब्ध होणार आहे. तसेच द्वारांचे सुलभ परिचालन शक्य होऊन पूरस्थितीत बंधाऱ्याची सुरक्षितता अधिक बळकट होईल.धरण सुरक्षितता अंतर्गत किल्लारी क्र. २ बंधारा निर्दिष्ट धरण म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्याच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक यांत्रिकी व विद्युत घटकांची दुरुस्ती करणे बंधनकारक आहे. मंजूर निधीमुळे ही कामे लवकरच मार्गी लागणार असल्याने किल्लारी परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण झाल्यास सिंचन व्यवस्थेला चालना मिळून शेती उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाला गती मिळाल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.या मंजुरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आमदार अभिमन्यू पवार यांनी आभार व्यक्त केले.

# सिध्देश्वर कॉलेज ऑफ फार्मसी स्नेहसंमेलन उत्साहात साजरा



**लातूर दि. १२ (प्रतिनिधी) :** विद्यार्थ्यांनी आपल्या ठरवलेल्या ध्येय सिद्धीसाठी जिज्ञासू राहुन सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास निश्चितच यशप्राप्ती होते असे प्रतिपादन सिध्देश्वर कॉलेज ऑफ फार्मसी अध्यक्ष शिवलींग जेवळे सर यांनी केले.

महाविद्यालयाच्या वाषिक स्नेहसंमेलन उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते या कार्यक्रमास ब्राईट हॉरिझोन सी बी एस ई शाळेचे सचीव रामदास पवार सर, सिध्देश्वर कॉलेज ऑफ फार्मसी सचीव संगमेश्वर रासुरे सर महाविद्यालय चे प्राचार्य डॉ शामलीला बावगे मॅडम आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना शिवलींग जेवळे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आई वडिलांच्या कष्टाची कायम जाणीव ठेवून जिद्द चिकाटी आत्मविश्वास.शिस्त, सकारात्मक दृष्टिकोन संयम इत्यादी गुणसंपन्न सदैव अंगी बाळगावी असे सांगितले. रामदास पवार सर व संगमेश्वर रासुरे सरांनी मार्गदर्शन केले कार्यक्रम ची प्रस्ताविक प्राचार्य डॉ शामलीला बावगे मॅडम यांनी केली, विद्यार्थ्यांनी त्यांची कला मधुन डान्स व गित सादर केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील सरांनी केले सोबत सर्व प्राध्यापक पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

CMYK

# प्रजापत्र

www.prajapatra.com

बीड जिल्हा विशेष | शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६ | पान-५


## 'तेजस'कडून शेतकऱ्यांसाठी धान्य तारण योजना

बीड दि.१२ (प्रतिनिधी): शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, बीड या संस्थेच्या वतीने धान्य तारण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना व सभासदांना त्यांच्या धान्यावर तारण ठेवून १६ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे.

तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ही संस्था २०१६ पासून सातत्याने कार्यरत असून, अल्पावधीतच संस्थेने सभासदांच्या विश्वासावर भक्कम उभारणी केली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, छोटे व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक आधार देण्यासाठी संस्था विविध योजना प्रभावीपणे राबवत आहे. संस्थेचे अध्यक्ष.ड प्रकाश कवठेकर यांच्या नेतृत्वाखाली ही धान्य तारण योजना सुरू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना धान्य विक्रीसाठी योग्य बाजारभाव मिळेपर्यंत तात्पुरत्या आर्थिक गरजा भागवता याव्यात, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना सावकारांवर अवलंबून राहावे लागणार नाही, तसेच कमी कालावधीत सुरक्षित व पारदर्शक पद्धतीने कर्ज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. धान्य तारण योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक सभासदांनी तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, बीड येथील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या व्यवस्थापनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## माळेगावात रंगला बैलगाडा शर्यतीचा थरार

### १८५ बैलगाड्यांचा सहभाग



केज दि.१२ (प्रतिनिधी): तालुक्यातील माळेगाव येथे दि. ११ (बुधवार) रोजी शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने बैलगाडा शर्यत – शिवतीर्थ केसरी २०२६ मोठ्या उत्साहात पार पडली. सकाळी शिवतीर्थ मैदानावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सकाळी १० वाजता शर्यतीला सुरुवात झाली. महाराष्ट्रभरातून तब्बल १८५ बैलजोड्यांनी सहभाग नोंदविल्याने स्पर्धेत चांगलीच रंगत आली. वाऱ्याच्या वेगाने धावणाऱ्या बैलजोड्यांचा थरार पाहण्यासाठी परिसरातील तरुण व नागरिकांनी मैदानावर मोठी गर्दी केली होती. बक्षिस वितरण काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेत जेलर ग्रुपचा 'जेलर भूतनाथ' आणि 'पब्लिक किंग विराट' ही बैलजोडी प्रथम क्रमांकाची ठरली. विजेत्या गाडीमालकाला स्कुटर बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. द्वितीय क्रमांक आदिती गित्ते यांचा 'ब्रेक फेल नंद्या' आणि सलीम पठाण यांचा 'स्पीड किंग राजा' या बैलजोडीने मिळवत ३१ हजार रुपये रोख बक्षीस जिंकले. तृतीय क्रमांक आर्वी येथील 'बादल' आणि 'सावळ्या' या बैलजोडीने मिळवला. याशिवाय चौथ्या ते आठव्या क्रमांकापर्यंतच्या विजेत्यांना अनुक्रमे १५ हजार, ११ हजार, ९ हजार, ७ हजार व ६ हजार रुपये अशी रोख बक्षिसे देण्यात आली. काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धा सुरळीत व नियमांनुसार पार पडावी यासाठी आयोजक व ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली

## धनादेश न वटल्या प्रकरणी साडे तीन लाखांच्या दंडासह पाच महिन्यांची शिक्षा

बीड दि.१२ (प्रतिनिधी): धनादेश अनादर प्रकरणात येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (द्वितीय) न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल देत आरोपीस साडेतीन लाख रुपये दंड व पाच महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

प्रकरणातील आरोपी शंकर प्रकाश कदम यांनी फिर्यादी राहुल बन्सीधर पोडके यांच्याकडून रुपये २ लाख ५० हजार उसनवारीने घेतले होते. संबंधित रक्कम परतफेड करताना आरोपीने फिर्यादीच्या नावे त्याच रकमेचा धनादेश दिला. मात्र हा धनादेश बँकेत सादर केल्यानंतर खात्यात पुरेशी शिल्लक नसल्याने तो अनादरित झाला. याप्रकरणी फिर्यादीने आरोपीविरुद्ध बीड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (द्वितीय) न्यायालयात समरी क्रिमिनल केस क्र. २६५५/२०१८ (राहुल विरुद्ध शंकर) दाखल केली होती. सुनावणीदरम्यान आरोपीच्या वतीने धनादेशाचा गैरवापर झाल्याचा बचाव मांडण्यात आला. तथापि, न्यायालयाने हा बचाव फेटाळून लावत आरोपीने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत गुन्हा केल्याचे सिद्ध झाल्याचे नमूद केले. त्यानुसार न्यायालयाने आरोपीस रुपये ३ लाख ५० हजार दंड व पाच महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. या प्रकरणात फिर्यादीतर्फे ॲड. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली. त्यांना ॲड. विशाल कदम, ॲड. अभिषेक बहिर, ॲड. माऊली डाके, ॲड. राजकुमार धरणे, ॲड. प्रदीप दराडे, ॲड. विजय डोके, ॲड. अमोल तिडके आणि ॲड. प्रतीक गव्हाणे यांनी सहकार्य केले.

## परळी शहरातील सीसीटीव्ही तात्काळ सुरू करा



### शरदचंद्र पवार गटाचे पोलिसांना निवेदन

परळी दि.१२(प्रतिनिधी): शहरातील कायदा व सुव्यवस्था आणि वाहतूक नियंत्रणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना शहरात बसविण्यात आलेले अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याचे वास्तव समोर आले आहे. यामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे कठीण होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने शहर पोलीस स्टेशन व संभाजीनगर पोलीस स्टेशन परळी वैजनाथ येथे निवेदन देण्यात आले.

शहरातील बंद सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ सुरू करावेत, वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक असलेली सी पी टू प्रणाली पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी, तसेच ज्या ठिकाणी पोलीस चौक्या आहेत, त्या प्रत्येक ठिकाणी किमान एक पोलीस कर्मचारी कायमस्वरूपी तैनात करावा, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे. परळी शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, मुख्य रस्ते व गर्दीच्या ठिकाणी रहदारी मोठ्या प्रमाणात वाढली असून योग्य नियोजन व नियंत्रणाअभावी वाहतूक कोंडी, अपघातांचे वाढते प्रमाण आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने गुन्हेगारांना मोकळे रान मिळत असून सर्वसामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

यावेळी उपस्थित शहर अध्यक्ष जीवन देशमुख,उत्तमराव माने, नगरसेवक नितीन बागवाले, नगरसेवक कादर कुरेशी, महादेव गंगणे, वैजनाथ कळसकर, अमर रोडे, अरुण सपाटे, सद्दाम शेक, राजा खान आदींची उपस्थिती होती.

## घरकुलाचे प्रलंबित हप्ते तात्काळ सोडावेत –जीवन हांगे

नांदूरघाट दि.१२ (वार्ताहर):प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच ओबीसी घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते तात्काळ वितरित करावेत व संबंधित अभियंता व संगणक ऑपरेटर यांच्यावर चौकशी करून कारवाई करावी, अशी लेखी मागणी सामाजिक कार्यकर्ते जीवन हांगे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती केज यांच्याकडे केली आहे.



दिलेल्या निवेदनात, केज तालुक्यातील काही गावांमध्ये घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाल्यानंतर पुढील हप्ते मंजूर होत नसल्याच्या तक्रारी आहेत. अनेक लाभार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने घरबांधणी अर्धवट अवस्थेत थांबली आहे. परिणामी संबंधित कुटुंबांना राहण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यासोबतच, काही ठिकाणी हप्ते सोडण्यासाठी अवैध पैशांची मागणी होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संबंधित अभियंता व संगणक ऑपरेटर लाभार्थ्यांकडून पैसे मागत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे जीवन हांगे यांनी नमूद केले आहे. गरीब लाभार्थ्यांची अडवणूक थांबवून त्यांना त्वरित न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. तातडीने कारवाई न झाल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशाराही हांगे यांनी दिला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व सर्व पात्र लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते त्वरित वितरित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, बीड; मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड; उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामीण विकास) तसेच संबंधित ग्रामीण गृहनिर्माण विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

## मोरवडच्या माध्यमिक विद्यालयात आनंदनगरी

वडवणी दि.१२(प्रतिनिधी): राजे शिवछत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ, मोरवड संचलित सुंदररावजीकाका शेळके पाटील माध्यमिक विद्यालय, मोरवड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आनंदनगरी उपक्रमाने शाळेचे प्रांगण अक्षरशः आनंदनगरीने बहरून गेले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष व्यवहारातून खऱ्या कमाईचा आनंद अनुभवत जीवनोपयोगी कौशल्यांचा अनोखा अनुभव घेतला.




शाळेचे संस्थापक अध्यक्ष अनंत शेळके यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सरपंच ड.राज पाटील, पुसरा गावचे सरपंच रामराव सावंत, चेअरमन महादेव नाईकवाडे, उपसरपंच अशोक निपटे, महादेव सावंत, सावंत, पत्रकार अशोक फपाळ, ज्ञानेश्वर नाईकवाडे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार शाळेच्या वतीने कोषाध्यक्ष बबलू शेळके, मुख्याध्यापक वाघ तसेच सर्व शिक्षकवृंदांनी केला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार करून आणलेले विविध खाद्यपदार्थ, किराणा साहित्य, भाजीपाला, कटलरी आदींची दुकाने थाटली होती. वडापाव, पावभाजी, भेळ, मिसळपाव, पुरी-भाजी, गरमागरम भजे, मसकापाव, समोसे, पाणीपुरी, जिलेबी, आईस्क्रीम, कुल्फी, पेप्सी, गाजर हलवा, पॅटीस, झुणका-भाकर, पिठलं-भाकर तसेच भारतातील विविध प्रांतांतील प्रसिद्ध पदार्थांची चव उपस्थितांना चाखता आली. शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी या पदार्थांची खरेदी करत विद्यार्थ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा उपक्रम केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या जीवनात उपयोगी पडणारा, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## माजलगावात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन



माजलगाव दि.१२ (प्रतिनिधी): माजलगाव भारतीय जनता पार्टीच्या वतीने समर्पण दिननिमित्त तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याकार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले. या प्रसंगी शहर सरचिटणीस पवन मोगरेकर यांनी अखंड मानवतावादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना मांडणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अविरतपणे समर्पण भावनेने केलेल्या कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमाला भाजपाचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे, दीपक मुंडे, प्रताप रांजवण, माजलगाव शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी, डॉ. अभिजीत सोळंके, अभय होके, शरद कचरे, कैलास खुरपे, बाळासाहेब क्षिररसागर, कल्याण शेप, विनोद लड्डा, रामेश्वर चव्हाण, रमेश शेंडगे, संतोष जाधव, सुभाष कांबळे,मनोज कोरडे, पवन मोगरेकर, नारायण मेंडके, संतोष सोळंके ,रवी गायकवाड, ओंकार गिरी, गोविंद जांगिड, बबलू राऊत ,किशोर विभुते यांच्यासह शक्ती प्रमुख बूथ प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

गेवराई दि.१२ (प्रतिनिधी) उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त तांदळा व तिंतरवणी येथे विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिवसेनेचे गेवराई विधानसभा प्रमुख नवनाथ गवते व तांदळा गावच्या विद्यमान सरपंच सोनाली नवनाथ गवते यांच्या पुढाकारातून हा उपक्रम उत्साहात पार पडला.

वाढदिवसाचे औचित्य साधत केवळ शुभेच्छांपुरते मर्यादित न राहता समाजोपयोगी कार्यातून समाजाशी नाळ जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. तांदळा येथील वारकरी संप्रदायाला मृदंग व टाळ भेट देण्यात आले. वारकरी परंपरेचा जप तसेच भजन-कीर्तन परंपरेला



चालना मिळावी, या उद्देशाने ही भेट देण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. वारकऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. याचबरोबर श्रीराम संस्थान, तिंतरवणी येथे सुमारे दीडशे मुलांना एक दिवसाचे अन्नदान करण्यात आले. लहानग्यांना प्रेमपूर्वक भोजन देत वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. अन्नदान उपक्रमामुळे मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. हा संपूर्ण उपक्रम शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमास ग्रामस्थ तसेच शिवसेनेचे गेवराई तालुक्यातील पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिरसमार्ग शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

गेवराई दि.१२ (प्रतिनिधी): तालुक्यातील सिरसमार्ग येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि. ११ फेब्रुवारी रोजी वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात व आनंदमय वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरणांतून आपल्या कलागुणांची प्रभावी झलक सादर करत उपस्थितांची मने जिंकली.



कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, समूह नृत्य, लघुनाट्य, एकांकिका, भावगीत, लोकनृत्य तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या नाटिका सादर केल्या. बेटी बचाओ, स्वच्छता अभियान आणि शिक्षणाचे महत्त्व या विषयांवरील सादरीकरणांना विशेष दाद मिळाली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक, ग्रामपंचायत सदस्य, पालकवर्ग व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी शालेय स्पर्धा व विविध उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सिरसमार्ग येथील हा सांस्कृतिक सोहळा विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला असून उपस्थितांनी कार्यक्रमाचे मनापासून कौतुक केले.

## के.के.पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

चौसाळा दि.१२ (वार्ताहर): राजर्षी शाहू महाराज संस्था संचलित के.के. पब्लिक स्कूल, वानगाव येथे दि. ११ फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात झाले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवून आपली वेगळी ओळख निर्माण करावी, अशा उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन संस्थेचे संस्थापक श्री.राऊत यांनी केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.जोगदंड होते, तर उद्घाटक म्हणून डॉ. प्रशांत गायकवाड उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थापक श्री. राऊत , सरपंच सुरेश वाघ (खडकी घाट), विजया वाघमारे (सरपंच, सावरगाव) यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्री.राऊत यांनी गुणवंत होण्यापेक्षा गुणांचा योग्य उपयोग करणारे कर्तृत्ववान होणे अधिक महत्त्वाचे आहे, असे सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील यांनी केले.

सांस्कृतिक सादरीकरणांमध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांनी भरतनाट्यम, कोळीगीत, देशभक्तीपर नृत्य, 'पाटलांचा बैलगाडा' नाट्यप्रयोग तसेच 'जन्म बाईचा' या स्त्रीसक्षमीकरणावर आधारित गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. 'बेटी बचाव, बेटी पढाओ' या सामाजिक संदेशावर आधारित सादरीकरणालाही विशेष प्रतिसाद मिळाला.विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी रंगलेले हे स्नेहसंमेलन उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरून....

**अजित पवारांच्या स्वप्नातील बीड......**

प्राप्त झालेला निधी विहित कालावधीत आणि गुणवत्तेसह खर्च करण्याच्या सूचना सुनेत्रा पवार यांनी दिल्या. या बैठकीस ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे,खा.बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.नमिता मुंदडा,आ.सुरेश धस उपस्थित होते.तर सभागृहात निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी,जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव आणि विविध विभागांचे जिल्हाप्रमुख उपस्थित होते.

**सामाजिक न्याय मंत्री असताना....**

गृहोपयोगी वस्तु संच वाटप करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय गुरुवारी (दि.१२) निर्गमित करण्यात आला आहे या मध्ये सर्वाधिक लाभार्थी संख्या बीड जिल्ह्यात २५ हजार इतकी असून तब्बल २५ कोटी रुपयांच्या भांड्यांचे बीड जिल्ह्यात वितरण होणार आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये साखर उद्योग हा एक प्रमुख उद्योग असून सद्यः स्थितीमध्ये राज्यात कार्यरत सहकार व खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांमध्ये उसतोड कामगार काम करतात. बहुतांश उसतोड कामगार हे राज्यातील विविध जिल्ह्यांत स्थलांतरीत होऊन काम करतात. या उसतोड कामगारांचे व पर्यायाने त्यांच्या कुटूंबियांचे जीवन अस्थिर व अत्यंत हलाखीचे असल्यामुळे त्यांचे जीवन सुखकारक करून त्यांचे राहणीमान उंचावून आयुष्य स्थिर व सुरक्षित करण्यासाठी ऊस तोडणी व्यवसायातील उसतोड कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये गोपीनाथ मुंडे उसतोड कामगार कल्याण महामंडळ स्थापन करण्यात आले आहे.ऊसतोड कामगार व त्यांचे कुटूंबिय दरवर्षी गळित हंगामाच्या कालावधीमध्ये ६ महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी कारखाना कार्यक्षेत्रामध्ये रिकाम्या शेतामध्ये ऊसाच्या पाचटापासून तयार केलेल्या झोपड्यांमध्ये त्यांचे वास्तव्य असते. या कालावधीमध्ये त्यांच्या मूळ गावावरून फारच त्रोटक / अपुरे साहित्य घेऊन येत असतात. ऊसतोड कामगारांकडे पुरेसे गृहोपयोगी साहित्य (स्वयंपाकाची भांडी) यांची कमतरता असल्यामुळे ऊसतोड कामगारांना अनेक अडी-अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे राज्यातील ऊसतोड कामगारांना गृहोपयोगी वस्तू संच वितरीत करण्यासाठी गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता आजच्या शासन निर्णयातून देण्यात आली आहे.तथापि, प्रथम टप्प्यामध्ये १ लाख लाभार्थ्यांना व उर्वरित लाभार्थी संख्येनुसार टप्प्याटप्प्याने सदर गृहोपयोगी वस्तू संच वेळोवेळी शासन मान्यतेनुसारच वाटप करण्यात येईल.

**गृहउपयोगी संचामध्ये असणार ३० वस्तू...**

ताटं ०४, वाटया ०८,पाण्याचे ग्लास०४,पातेले झाकणासह (लहान) ०१, पातेले झाकणासह (मध्यम) ०१,पातेले झाकणासह (मोठे) ०१,मोठा चमचा (भात वाटपाकरीता) ०९, मोठा चमचा (वरण/भाजी वाटपाकरीता) ०१, पाण्याचा जग (०२ लिटर) १०, मसाला डब्बा ०१,डब्बा झाकणासह (१४ इंच) ०१, डब्बा झाकणासह (१६ इंच) ०१,डब्बा झाकणासह (१८ इंच) ०१, परात ०१, प्रेशर कुकर (०५ लिटर) स्टेनलेस स्टील ०१, कढई (स्टील), स्टीलची टाकी मोठी झाकणासह वगराळासह ०१ असे एकूण ३० भांडे समाविष्ट असलेला संच वितरीत करण्यात येणार आहेत.

**घरात घुसून महिलेल.....**

इतरांनी बाजूच्या घरात जाऊन हा हल्ला केल्याचे दिसून येत आहे. दरम्यान या वादाच्या प्रकरणात पेठ बीड पोलीस ठाण्यात एका गटाकडून विनयभंगाची तक्रार दाखल झालेली आहे. दुसऱ्या गटाकडून मात्र या प्रकरणात अद्याप तक्रार आली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

**अंबाजोगाईला 'पुस्तकांचे गाव'....**

वाङ्मयीन पार्श्वभूमीचा विचार करूनच महाराष्ट्र राज्याच्या उद्योग व मराठी भाषा मंत्र्यांनी अंबाजोगाईला 'पुस्तकांचे गाव' म्हणून विकसित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली होती. मात्र, या घोषणेनंतरही संबंधित विभागाचा अधिकृत शासन निर्णय निर्गमित होणे अद्याप प्रतीक्षाधीन आहे. राज्य मराठी विकास संस्थेने या संदर्भात अंबाजोगाई शहराची सर्वंकष माहिती, निकष आणि अटींनुसार एका नमुन्यात मागवली होती. यामध्ये गावाची लोकसंख्या, सोयीसुविधा, ऐतिहासिक स्मारके, प्रेक्षणीय स्थळे आणि प्रकल्पासाठी उपलब्ध होऊ शकणारी जागा अशा विविध मुद्द्यांचा समावेश आहे. ही माहिती वेळेत सादर न झाल्यामुळे शासन निर्णय प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला असल्याचे समोर आले आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी यापूर्वी २५ ऑगस्ट २०२५ रोजी देखील या विषयाचा पाठपुरावा केला होता. आता पुन्हा एकदा त्यांनी प्रशासनाला स्मरणपत्र देत स्पष्ट केले आहे की, राज्य मराठी विकास संस्थेने मागवलेली माहिती त्वरित पाठवण्यात यावी, जेणेकरून 'पुस्तकांचे गाव' आणि 'कवितांचे गाव' या योजनांचा शासन निर्णय मार्गी लागेल. या प्रकल्पामुळे अंबाजोगाईच्या साहित्यिक वैभवात भर पडणार असून पर्यटनालाही मोठी चालना मिळणार आहे.

**ट्रॅक्टर अंगावर पडून .....**

सुमारे २ च्या सुमारास ते शेतातील कामासाठी ट्रॅक्टर घेऊन जात असताना शेतातील वळण रस्त्यावर ट्रॅक्टर वळविताना वाहनाचा तोल जाऊन ट्रॅक्टर पलटी झाले. या अपघातात ट्रॅक्टर त्यांच्या अंगावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलविले; मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती मृत घोषित केले. या घटनेमुळे हिवरा (बु.) गावात शोककळा पसरली आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या तरुणाच्या अचानक निधनामुळे गाडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची नोंद ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

**सिमेंटच्या गोणीतून गांजाची.......**

माहिती मिळाल्यावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी एका शेतात छापा मारून याचा फर्दाफ़ाश केला.या कारवाईत ११ किलो १५० ग्रॅम गांजा ज्याची किंमत २ लाख ७८ हजार ७५० रुपयांच्या घरात असल्याची माहिती आहे.नेकनूर पोलिसांनी यावेळी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केले. नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिंगणी बुद्रुक गावात एका उसाच्या शेतात सिमेंटच्या गोणीत गांज्या भरून ठेवण्यात आला होता.याची माहिती नेकनूर पोलिसांना झाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी व त्यांच्या टीमने छापा मारला.यावेळी शेतात दोन सिमेंटच्या गोणीत ११ किलो १५० ग्रॅम गांज्या पोलिसांना सापडला.या गांज्याची तस्करी होणार असतानाच पोलिसांनी गुमानसिंग शिवराम पावरा (वय-३५,रा.बोरमल्ली पाडा,ता.शिरपूर,जि.धुळे) व मनोज सीताराम मेहता (वय१९,रा.बाखरली,ता.वरला,जि.बडवानी राज्य.मध्यप्रदेश) या दोघांना रंगेहात पकडले आहे.नेकनूर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आहेर हे करीत आहेत.

**बीडमध्ये अजित पवार यांच्या स्मारकासाठी......**

बीड जिल्हाधिकारी कार्यालयातून दृकश्राव्य प्रणालीद्वारे आ. विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत सहभागी होत बीड नगर परिषद हद्दीत दिवंगत अजित पवार यांचे स्मारक उभारण्यासाठी विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करण्याची मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय सकारात्मक पध्दतीने त्यास मान्यता देऊन हिरवा कंदिल दाखविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.१२ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनांचा प्रारुप आराखडा अंतिम करण्यासाठी राज्यस्तरीय नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित बीड जिल्हाधिकारी कार्यालयातून या बैठकीत सहभागी झाले. स्व.अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्विकारल्यानंतर त्यांनी बीड जिल्ह्यात अनेक विकास कामांची सुरुवात केली. अनेक विकास योजना सक्षमपणे राबविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. पालकमंत्री म्हणून अजित पवार यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील जनतेने आश्वासक विकासाचे स्वप्न पाहिले आहे. बीड जिल्ह्याच्या इतिहासात कर्तृत्ववान पालकमंत्री म्हणून दिवंगत दादांचा नक्कीच उल्लेख होणार आहे. त्यांच्या स्मृती बीडकरांसाठी सदैव प्रेरणादायी असल्यामुळे बीड नगर परिषद कार्यक्षेत्रात दिवंगत अजितदादा पवार यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी लागणारा निधी राज्यस्तरीय नियोजनातून विशेष बाब म्हणून उपलब्ध करावा, अशी मागणी या बैठकीत आ. विजयसिंह पंडित यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यास मान्यता दिली असून दिवंगत अजित पवार यांच्या बीड शहरातील भव्य स्मारकास त्यांनी हिरवा कंदिल दाखविला आहे.

**गेवराई नगरपरिषद विषय समित्यांच्या........**

आसिया शफियोद्दीन सय्यद यांची निवड करण्यात आली असून, उपसभापती म्हणून सोनाली सुभाष सुतार यांची निवड झाली आहे. स्वच्छता विभागाची जबाबदारी प्रशांत राख यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.निवड झालेल्या सर्व सभापती व उपसभापतींचे नगराध्यक्षा गिता बाळराजे पवार यांनी अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व नगरसेवक, नगरसेविका, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# प्रजापत्र

शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६




# संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह बांधकामासाठी मंजूरी

## आ.संदिप क्षीरसागर यांनी मानले आभार

बीड दि.१२ (प्रतिनिधी): ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतीगृह होणार हा निर्णय संपुर्ण बीड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक झाला आहे. संत भगवानबाबा शासकीय वसतीगृहाच्या बांधकामासाठी शासनाकडून भरघोस निधीसह मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आ.संदिप क्षीरसागर यांनी दिवंगत नेते अजित पवार तसेच महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत.

मागील मोठ्या कालावधीपासून बीड विधानसभा मतदारसंघाचा आमदार या नात्याने बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत ऊसतोड कामगारांची मोठी संख्या लक्षात घेवून त्यांच्या मुला-मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि हक्काचे शासकीय वसतीगृह उभारण्यात यावे या करीता आ.संदिप क्षीरसागरांचा पाठपुरावा सुरू होता. संत भगवानबाबा शासकीय वसतीगृह योजना प्रभावीपणे राबवून ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाची संधी मिळावी. या करीता



दुरदृष्टी असलेले दिवंगत नेते अजित पवार यांनी सकारात्मक भूमिका घेत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास सहमती दर्शविली होती. तसेच, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनीही या कामास मंजुरी देऊन मोठा निर्णय घेतला. बुधवार (दि.११) रोजी शासन निर्णयाव्दारे बीड जिल्ह्यातील ११ वसतीगृह बांधकामाच्या कामास शासनस्तरावरून तब्बल १५९.३६ कोटी रूपयांच्या भरघोस निधीसह मंजुरी देण्यात आली. त्यात बीड मतदारसंघासाठी बीड शहरात संत भगवानबाबा मुलींचे शासकीय वसतीगृह बांधकामाकरीता १४ कोटी ५६ लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. हा निर्णय केवळ वसतीगृह उभारणीपुरता मर्यादित नसून तो ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या उज्वल भविष्यसाठी घेतलेला ऐतिहासिक टप्पा आहे. बीड मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणून मी अजित पवार व महाराष्ट्र शासनाचे आभार मानत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# नगरसेवकांनी जनतेला वेळ द्यावा-माजी आ.पवार

गेवराई दि.१२ (प्रतिनिधी ) : हक्काची जागा आणि अतिक्रमण धारकाच्या जागेवर नियमाने घरकुल आवास योजनेंतर्गत लाभ मिळवून देण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज आहे. नवनिर्वाचित नगरसेवकांनी स्वच्छता, पाणी आणि घरकुल, या तीन गोष्टींवर लक्ष देऊन, योजना पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, त्याचा पाठपुरावा करून, लाभधारकांना लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना केले. तसेच जनतेला वेळ दिला तर तुमच्या पदाला अर्थ आहे असे नगरसेवकांना सांगितले आहे.



गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात गुरूवारी ( दि. १२) सकाळी ११ वाजता, माजी आ. लक्ष्मणराव पवार, बाळराजे पवार, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, रेवती घुंबार्डे, ड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत घरकुल आवास योजनेची आढावा बैठक पार पडली. बैठकीत गेवराई शहरातील घरकुल आवास योजनेंतर्गत मंजूर, नामंजूर करण्यात आलेल्या विषयावर चर्चा करण्यात आली. या योजनेंतर्गत येणाऱ्या अडचणी, ज्यांना लाभ मिळाला आणि ज्यांना लाभ मिळण्यात अडचणी आल्या, अशा विविध विषयांवर लक्ष्मण पवार, बाळराजे पवार यांनी मार्गदर्शन केले. मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी मंजूर करण्यात आलेले घरकुल व प्रस्तावित असलेल्या घरकुल आवास योजनेंची माहिती देऊन, या योजनेंतर्गत पूर्ण व प्रगतीपथावर असलेल्या घरकुलाची माहिती दिली. माजी आमदार पवार यांनी सांगितले की, घरकुल आवास योजना महत्त्वपूर्ण टप्पा आहे. तीन चार महिन्यांत मूर्त रूप येईल, अशा पद्धतीने काम करा, आपण निधी उपलब्ध करून देऊ , तसेच पंधरा दिवसाला आढावा बैठक घ्या, दोन - तीन ग्रुप करण्याची सूचना ही त्यांनी केली. नगरसेवकांनी वेळ द्यावा, तरच तुमच्या पदाला अर्थ आहे. सुरूवात करा म्हणजे, तुम्हाला लाभधारक कागदपत्रासाठी मदत करतील, असे निरिक्षण ही त्यांनी नोंदविले आहे. यावेळी सर्व नगरसेवक, सभापती, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# बीडमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयावर कामगारांचा मोर्चा धडकला




बीड दि.१२ (प्रतिनिधी): देशभरामध्ये कामगार-शेतकऱ्यांचा देशव्यापी संप होता. यानिमित्ताने बीडमध्ये सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सीटू) या कामगार संघटनेच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून दुपारी मोर्चा सुरू होऊन नगर रोड मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय येथे धडकला. मोर्चातील घोषणांमुळे परिसर दणाणून गेले होते. या मोर्चात सीटू आणि संलग्न सर्व कामगार संघटना, किसान सभा, शेतमजूर युनियन लाल बावटा, डीवायएफआय, एसएफआय या संघटना सहभागी झाल्या. महिलांच्या प्रमुख सहभागासह मोर्चामध्ये ८०० पेक्षा जास्त लोकांचा सहभाग होता.

भारत-अमेरिका नव्या व्यापारी करारानुसार अमेरिकेतील कृषी मालाला भारतीय बाजारपेठ खुली करून अमेरिकेसोबत ४१ लाख कोटी रुपयांचा करार सरकारने केला असून या कराराचा फटका देशातील कृषी व्यवस्थेला बसणार आहे. अमेरिकन मका, लाल ज्वारीपासून तयार केलेले इथेनॉल भारतात बंदी असलेल्या जीएम पिकांपासून तयार केलेले खाद्यतेल, सोयाबीन, पशुखाद्य, फ्रूट्स, सुकामेवा, फळे, भाज्या व पोल्ट्री यासाठी अमेरिकन मालाला भारतीय बाजारपेठ खुली करण्याचा निर्णय घेतला आहे. देशात पिकविलेल्या पिकांना हमीभाव न देता बी-बियाणे, खते, इंधन यांसारख्या आवश्यक साहित्याचे दरवाढ करत विदेशी आयात वाढवण्याच्या निर्णयामुळे शेती आणि शेतकरी उद्ध्वस्त होणार आहेत. पेट्रोलियम पदार्थांच्या मोठ्या प्रमाणात दरवाढ होऊन त्याचा फटका सर्वसामान्यांना बसणार आहे. शेती आणि दुग्धव्यवसाय यावर घातक परिणाम होणार असून कामगार विरोधी कायदे, अग्निपथ योजना, खाजगीकरण या निर्णयांचा निषेध करण्यात येत आहे. या मोर्चाचे नेतृत्व सीटूचे राज्य सचिव डॉ. अशोक थोरात, एसएफआयचे राज्य अध्यक्ष रोहिदास जाधव, बांधकाम कामगार संघटनेचे राज्य सचिव ओम पुरी, शालेय पोषण कामगार संघटनेच्या राज्य कोषाध्यक्ष तथा जनवादी महिला संघटनेच्या नेत्या मीरा शिंदे, स्वाभिमानी विद्युत कामगार संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष डी. बी. बोर्डे, वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष जगन्नाथ निकम, डीवायएफआयचे जिल्हा कोषाध्यक्ष सुहास जायभाये, अशोक कातखडे, शिवा चव्हाण, सावित्रा मुळे, लता खेपकर, भागवत जाधव आदींनी केले.

# रेल्वे प्रशासनाच्या चुकीची शेतकऱ्यांना शिक्षा

**पाणी असूनही पिके जळू लागली**

आष्टी दि.१२ (प्रतिनिधी): रेल्वे प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे कडा परिसरातील ढोबळे वस्तीवरील शेतकऱ्यांवर संकट ओढवले आहे. 'कडा मध्यम प्रकल्पातून' पाणी सोडूनही रेल्वे पुलाजवळील हौद गळतीमुळे हे पाणी शेतकऱ्यांच्या शेता ऐवजी नाल्यातून वाहून जात आहे. यामुळे ऐन हंगामात हाताशी आलेली पिके पाण्याअभावी जळू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

दि.०६ फेब्रुवारी २०२६ रोजी सिंचन शाखा कडा (पाटबंधारे उपविभाग आष्टी) अंतर्गत असलेल्या कडा मध्यम प्रकल्पातून गावाला पाणी सोडण्यात आले होते. मात्र, केरूळ रोडवरील ढोबळे वस्ती येथील रेल्वे पुलाजवळील रेल्वे क्रॉसिंगवरील दोन्ही बाजूचे हौद मोठ्या प्रमाणात लिकेज असल्याचे समोर आले आहे. या गळतीमुळे पाण्याचा प्रवाह कडा गावापर्यंत पोहोचू शकला नाही. पाण्याचा हा अपव्यय रेल्वे पुलाजवळील साईड नाल्याद्वारे होत असल्याने मौल्यवान पाणी वाया जात आहे. एकीकडे धरणात पाणी असूनही तांत्रिक बिघाडामुळे ते शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचत नाहीये, तर दुसरीकडे पाण्याचे नियोजन फसल्याने पाटबंधारे विभाग आणि शेतकरी या दोघांचेही आर्थिक नुकसान होत आहे.

# जिओच्या ढिसाळ सेवेविरोधात ग्रामस्थांचे टॉवरवर चढून आंदोलन

बीड दि.१२ (प्रतिनिधी): तालुक्यातील बालाघाट परिसरातील लिंबागणेश व पंचक्रोशी भागात रिलायन्स जिओ मोबाईल नेटवर्क सेवा गेल्या महिनाभरापासून वारंवार खंडित होत असल्याने संतप्त ग्रामस्थांनी गुरुवारी जिओ टॉवरवर चढून लक्षवेधी आंदोलन केले.

नेटवर्क रेंज पूर्ण दिसत असतानाही इंटरनेट सेवा बंद पडणे, कॉल न लागणे तसेच वारंवार कॉल ड्रॉप होणे या तांत्रिक समस्यांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या बिघाडाचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणाला, बँकिंग व डिजिटल व्यवहारांना, व्यापारी उलाढालींना तसेच शासकीय व



आरोग्य सेवांना बसत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. जिओ कंपनीने तातडीने नेटवर्क सेवा सुरळीत करावी व कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तसेच बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. महसूल व पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. याबाबतचे निवेदन लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार राठोड, मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे व तलाठी पोतदार यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व नेकनूर पोलिस ठाण्यास देण्यात आले. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मोरे, दामोदर थोरात, सुरेश निर्मळ, मधुकर थोरात, सर्पमित्र अशोक जाधव, औदुंबर नाईकवाडे, विक्रांत वाणी, सोनाजी शिंदे, सोनाजी कुदळे आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी जीवनात उच्च ध्येय साध्य करावे-पांढरे

देवळा दि.१२ (प्रतिनिधी): जिद्द, चिकाटी व बुद्धीच्या बळावर विद्यार्थ्यांनी जीवनात उच्च ध्येय साध्य करावे, असे प्रतिपादन श्री. पांढरे यांनी केले. दयानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय देवळा (ख.) येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. रेडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री. पांढरे ( मुख्याध्यापक जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा देवळा ( ख.) श्री. शिंदे ( माजी मुख्याध्यापक),




प्रा.गोविंद राऊत, श्री.कोकाटे,श्री. गायकवाड,श्री. वाघमारे, श्री. साळवे, प्रथम कॉम्प्युटरचे श्री. वाघमारे,श्री. बांगर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पुढे श्री.पांढरे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अथक मेहनत व अपार कष्ट घेऊन उच्च ध्येय साध्य करावे. विद्यार्थी कसा असावा तर संस्कृत मध्ये एक प्रसिद्ध श्लोक आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांकडे कावळ्यासारखी सावधानता, बगळ्यासारखे ध्यान, श्वानासारखी अल्प झोप, अल्प आहारी व ग्रह त्यागी असे विद्यार्थ्यांमध्ये पाच गुण असले पाहिजेत असे सांगितले. प्रा.राऊत यांनी आजच्या आधुनिक युगात भौतिक सुखे सर्व आपल्या पायाशी लोळण घेत असताना, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात माणूस म्हणून जगायला शिकले पाहिजे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी डोंगरे आरती, चोले आरती यांनी केले. प्रास्ताविक शेळके दिपाली हिने केले तर आभार प्रदर्शन दराडे स्वरूपा हिने केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. कदम व नववीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# सादोळा ग्रामस्थांचे पंचायत समितीसमोर उपोषण

माजलगाव दि.१२ (प्रतिनिधी):प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थी यादीत नाव असूनही घराचा लाभ मिळत नसल्याने, बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील सदोळा येथील ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. या मागणीसाठी समस्त गावकरी मंडळींनी माजलगाव पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

सादोळा ग्रामपंचायतीमधील अनेक गरजू लाभार्थ्यांची नावे केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास




योजनेच्या अधिकृत यादीत समाविष्ट आहेत. मात्र, यादीत नाव येऊन बराच काळ लोटला तरी अद्याप त्यांना घरकुलाचा प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून दाद मिळत नसल्याने, संतप्त लाभार्थ्यांनी अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. उपोषणकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, पात्र असूनही केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक कुटुंबे हक्काच्या घरापासून वंचित आहेत. ग्रामीण भागात पावसाळा आणि कडक उन्हात कच्च्या घरात राहणे कठीण होत असून, सरकारने त्वरित निधी मंजूर करावा अशी त्यांची मागणी आहे. यादीत नाव असून लाभ का दिला जात नाही? असा सवाल गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे. पंचायत समिती प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन ठोस आश्वासन द्यावे, अन्यथा हे उपोषण अधिक तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या आंदोलनामुळे तालुक्यातील घरकुल योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आल्या आहेत.

# 'गजानन'च्या छत्रपती संभाजीनगर शाखेचा वर्धापनदिन उत्साहात

छत्रपती संभाजीनगर दि.१२(प्रतिनिधी) :विश्वास, पारदर्शकता आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक उन्नतीचा ध्यास घेत कार्यरत असलेल्या श्री गजानन नागरी सहकारी बँकेच्या छत्रपती संभाजीनगर शाखेचा द्वितीय वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. दोन वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेत भविष्यातील प्रगतीचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

वर्धापनदिनानिमित्त बँकेच्या संचालिका शैलजा आघाव व दत्तात्रय आघाव यांनी शाखेस भेट देऊन कामकाजाची सविस्तर पाहणी केली. शाखेतील एकूण ठेवी, कर्जवाटप, आर्थिक वाढ व ग्राहकसेवा याबाबतची माहिती त्यांना सादर करण्यात आली. शाखेची समाधानकारक आर्थिक प्रगती पाहून त्यांनी समाधान व्यक्त करत हीच गती पुढील काळात कायम राखण्याच्या सूचना दिल्या. स्थानिक सल्लागार समिती सदस्य शिवकुमार शेलार यांनी ग्राहकांशी संवाद साधत शाखेच्या विविध सेवा उपक्रमांचे कौतुक केले. अर्जून जगताप यांनी ठेवी वाढीसाठी परिचितांना प्रोत्साहित करण्याचे आश्वासन दिले, तर बँकेच्या पॅनेलवरील ॲड. अंगद मुंडे यांनीही ठेवी वृद्धीसाठी सक्रिय प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# 'एनए' अट रद्दमुळे जनतेला मोठा दिलासा-शंकर देशमुख

बीड दि.१२ (प्रतिनिधी): मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने जमीन महसूल कायद्यात ऐतिहासिक बदल करत निवासी व वाणिज्य बांधकामांसाठी आवश्यक असलेली 'एनए' (अकृषक) परवानगीची अट रद्द केली आहे. या निर्णयामुळे जमीनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे असे मत जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी व्यक्त केले.



राज्य शासनाने मंगळवारी यासंदर्भातील शासन आदेश जारी केला. यापूर्वी बांधकामासाठी जमिनीला अकृषक परवानगी आवश्यक होती. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करून अकृषक कर भरून जमीन बिनशेती करून घ्यावी लागत होती. एनए परवानगीशिवाय बांधकाम परवानगी मिळत नव्हती. तसेच महसूल विभागाकडून दरवर्षी अकृषक कर आकारला जात होता, तर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मालमत्ता करही आकारला जात होता. या दुहेरी करप्रणालीला अनेक वर्षांपासून विरोध होत होता. राज्य सरकारने ही जाचक अट रद्द केल्याने आता जिल्हाधिकाऱ्यांकडे स्वतंत्र एनए परवानगीसाठी चकरा मारण्याची गरज राहणार नाही. सातबारा उताऱ्यावर आवश्यक नोंदी आपोआप करण्यात येणार असून वार्षिक अकृषक करही रद्द करण्यात आला आहे.

यापुढे बांधकामासाठी संबंधित नगररचना विभाग किंवा स्थानिक प्राधिकरणाकडे अर्ज सादर करावा लागेल. एकवेळ अकृषक शुल्क भरल्यानंतर ले-आऊटला मंजुरी दिली जाईल. या निर्णयामुळे शेकडो गृहनिर्माण संस्था, बांधकाम व्यावसायिक व सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होणार असल्याचे देशमुख यांनी नमूद केले. जाचक कायदे व अटी दूर करून शासनाने विकासाला चालना दिली असून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराचे स्वागत होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# चंपावती महोत्सवात १९ हजारांहून अधिक बालकलाकारांचा सहभाग



बीड दि.१२ (प्रतिनिधी)बीडच्या सांस्कृतिक विश्वाला नवा उन्मेष देणारा अनिल जगताप फाउंडेशन व शिवसेना, बीड यांच्या वतीने आयोजित चौथा 'चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडक' स्पर्धा यंदा विक्रमी उत्साहात झाली. जिल्ह्यातील २९६ शाळांमधील तब्बल १९ हजार ५७० बालकलाकारांनी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला व रांगोळी या विविध कला प्रकारांत सहभाग नोंदवत महोत्सवाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. विविध स्पर्धांतील विजेत्यांना एकूण ४७२ पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

गेवराई, परळी, अंबाजोगाई, केज, माजलगाव, बीड, आष्टी व पाटोदा तालुक्यांतील ग्रामीण भागासह शहरांमधून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्वोत्तम शाळा (मराठी माध्यम) म्हणून संस्कार विद्यालय, बीड तर (इंग्रजी माध्यम) श्री भगवान इंग्लिश स्कूल, बीड यांनी महाकरंडक पटकावला. तसेच सर्वाधिक सहभाग नोंदवणाऱ्या संस्कार विद्यालय, बीड व व्हॅल्यू इंटरनॅशनल स्कूल, सावरगाव यांना संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे करंडक प्रदान करण्यात आला. बीड शहरात सलग दहा दिवस चाललेल्या या जिल्हास्तरीय महोत्सवाचा बक्षीस वितरण सोहळा मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत उत्साहात पार पडला. महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कांबळे यांनी प्रास्ताविकात महोत्सवाची माहिती दिली. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी बालकलाकारांच्या हक्काचा चंपावती महोत्सव कदापी बंद पडू देणार नाही. हा कलेचा सोहळा अविरत सुरू राहील,असा निर्धार व्यक्त केला.

# परळीत महाशिवरात्री महोत्सवासाठी प्रशासन सज्ज

परळी दि.१२ (प्रतिनिधी): प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही परळी वैजनाथ येथे महाशिवरात्री महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून, भाविकांच्या सोयीसाठी देवस्थान प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. 'श्री' वैद्यनाथांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सुलभ, सुरक्षित व सुरळीत दर्शन मिळावे तसेच मंदिराचे पावित्र्य व मांगल्य अबाधित राहावे यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

दर्शनासाठी पुरुष व महिला अशा स्वतंत्र रांगा ठेवण्यात आल्या असून, बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र मार्ग निश्चित करण्यात आला आहे. गर्दीचे प्रभावी नियमन करण्यासाठी १०० रुपयांची दर्शन प्रवेश पत्रिका (पास) व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. पासधारकांना स्वतंत्र रांगेतून दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. दर्शन पास विक्रीची सुविधा मंदिर परिसरातील वैद्यनाथ बँकेच्या स्टॉलमध्ये उपलब्ध असून, शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया (टॉवर व गांधी मार्केट), आयडीबीआय बँक, महाराष्ट्र बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, दीनदयाळ बँक तसेच वैद्यनाथ बँकेच्या शाखांमध्येही पास उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महोत्सवानिमित्त बुधवार, दि. १५ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत जिल्हाधिकारी, बीड यांच्या हस्ते 'श्री'चा रूद्राभिषेक होणार आहे. त्यानंतर भाविकांना अभिषेकासाठी परवानगी देण्यात येईल. एका आवर्तनासाठी २०० रुपये तर सपत्नीक ३०० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. अभिषेकासाठी कार्यालयातून पावती घेणे आवश्यक आहे. शुक्रवार, दि. १७ रोजी सायंकाळी ५ वाजता 'श्री'ची पालखी सवाद्य मिरवणुकीने निघणार आहे. सायंकाळी ६ वाजता देशमुखपारा येथे प्रसिद्ध गायिका विदुषी मंजुषा पाटील (पुणे) यांचा भक्तीगीत व अभंगवाणीचा कार्यक्रम होणार आहे. रात्री ९ वाजता अंबेवेस येथे शोभेची आतषबाजी करण्यात येणार असून, विविध मार्गांनी मिरवणूक काढून पालखी पुन्हा मंदिरात परत येईल.


PRAJAPATRA Newspaper Printed, Published and Owned by **Malani Sanjay Badrinarayan** and Printed at **Shri Jagmitra Printers & Sales Corporation,** Sumati Nagar, Jalna road, Beed, Dist - Beed Pin- 431122 (Maharashtra) and published at Prajapatra office, beside Sarveshwar Ganesh mandir, Sahyog nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed - 431122 (Maharashtra) **Editor : Malani Sanjay Badrinarayan**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **मालाणी संजय बद्रीनारायण** यांनी श्री जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कार्पोरेशन, सुमतीनगर, जालना रोड, बीड जि.बीड - पिन- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून प्रजापत्र कार्यालय,सर्वेश्वर गणेश मंदिराच्याबाजूला,सहयोगनगर, बीड येथे प्रसिद्ध केले.

फोन - ०२४४२: २३३२५५, **संपादक- मालाणी संजय बद्रीनारायण**